Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80







हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.


“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


।। भूतेषु दया हि धर्मः।।

मूल्य रु. ५


क्रमांक १,२,३,४ वर्ष : ४२ एप्रिल २० - मार्च २१


**BOOK POST**

TO,


Regd. with Registrar of News papers of India Reg. No. RN 37436/80



**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## ठाणे मंच रौप्य वर्षानिमित्त दोन स्पर्धा

ठाणे सांस्कृतिक मंचचा पहिला कार्यक्रम २५ ऑगस्ट १९९६ रोजी संपन्न झाला. तेव्हा २०२०-२०२१ हे मंचाचे रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्याचा मानस आहे. त्या अंतर्गत मराठी सुगम संगीत व एकल नृत्य अशा दोन स्पर्धा भरविण्यांत येतील.

**तारीख** : नंतर कळविण्यात येईल.

**स्थळ** : ठाणे व मुलुंड (नंतर कळविण्यात येईल)

वयाची अट नाही.

**अवधी (गाणे व नृत्य)** : ३ ते ४ मिनिटांत सादर करणे.

स्पर्धकांनी लवकरांत लवकर आमच्याशी संपर्क साधावा म्हणजे कार्यक्रमाचे व्यवस्थित नियोजन करणे सुलभ होईल.

**१. मराठी सुगम संगीत स्पर्धा**

- प्रथम पारितोषिक : रु. ५०००
  द्वितीय परितोषिक : रु. ४०००
  तृतीय पारितोषिक : रु. ३००० अधिक उत्तेजनार्थ पारितोषिक
- स्पर्धकाने आपल्या पसंतीची तीन गाणी कळवावी. परीक्षक त्यातले एक गाणे स्पर्धकास सादर करण्यास सांगतील.
- ठाणे मंच तबला व हार्मोनियमची व्यवस्था करेल.

**२. एकल नृत्य स्पर्धा-शास्त्रीय, लोकनृत्य**

- प्रथम पारितोषिक : रु. ५५००
  द्वितीय परितोषिक : रु. ४०००
  तृतीय पारितोषिक : रु. ३५०० अधिक उत्तेजनार्थ पारितोषिक
- नृत्यासाठी लागणारा पोषाख स्पर्धकाने स्वखर्चाने आणावयाचा आहे.

सर्व ज्ञातिबांधवांनी स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

**संपर्क**

| | | |
|---|---|---|
| **सुरेश पालेकर** | **अरुण वाघ** | **राजेश दिवेकर** |
| ८९२८८५०१९३ | ९८२०३७७१०२ | ९६१९३६२४६० |
| ०२२-२५३६४३२८ | | |



| | | |
|---|---|---|
| ९. | डॉ. विनायक बाबुराव नाडकर्णी यांच्या ७ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. मोरश्वर व कन्या श्रीमती शारदा व जयश्री यांजकडून. | ५०,००० |
| १०. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्य वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| ११. | श्रीमती शकुंतला मधुकर वाघ यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. अविनाश मधुकर वाघ यांजकडून. | १,००,००० |
| १२. | श्री. माधव दत्तात्रय वर्टी यांच्या १२ व्या पुण्यतिर्थी निमित्त पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून. | १,००१ |
| १३. | श्रीमती उषा प्रभाकर फडणीस (पूर्वाश्रमीच्या स्नेहलता विश्वंभर गायतोंडे) यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १,००,००० |
| १४. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर याच्या २४ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| १५. | श्रीमती शकुंतला मधुकर वाघ यांच्या स्मरणार्थ भाची कु. अनीता अविनाश वाघ हिजकडून. | १,०५४ |

### ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती अपर्णा सदानंद देसाई<br>मकर संक्रात तिळगूळ समारंभा निमित्त | ठाणे | ६,००० |
| २. | श्रीमती मृदुला गोविंद भांडारकर | गिरगांव | ५,००१ |

पृ. २५ वरुन

### पैसे जमा करण्यासाठी बँकेची माहिती

**Account Name :** We Together Foundation
**Account No. :** 39043377661
**Bank :** State Bank of India
**Branch :** Kolshet Road Thane West
**IFSC Code** : SBIN0021282
**Account Type :** Current

### धान्यबँकेशी कसा संपर्क कराल ?

- 9820713303/98192226067/9833793955 या क्रमांकावर आमच्या ऑफिसमध्ये सकाळी ११ ते संध्याकाळी ६, या वेळेत फोन करा, किंवा इमेल द्वारे संपर्क करा. wetogethethane@gmail.com
- आमच्या संकेतस्थळास भेट द्या, विस्तृत माहिती जाणून घ्या http://wetogetherorg.co.in अथवा संस्थेच्या सध्याच्या घडामोडी जाणून घेण्यासाठी आमच्या फेसबुक पेजला भेट द्या.

**लाईक करा, facebook.com/WeTogetherGroupThane /**
**सर्वांनाच सत्पात्री दान करण्याची सुवर्ण संधी**

**आपले नम्र**

**शीला दिवेकर** **चित्रा कामत** **मंजिरी कुलकर्णी**

| | | |
|---|---|---|
| १२. | श्रीमती नलिनी (विमल) महाबळेश्वर शानभाग यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. गिरीश यांजकडून. | ७५,५०१ |
| १३. | श्रीमती शकुंतला मधुकर वाघ यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. अविनाश मधुकर वाघ यांजकडून. | १,००,००० |
| १४. | पितरांच्या स्मरणार्थ पितृपक्षा निमित्त श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून. | ५,००० |
| १५. | पितरांच्या स्मरणार्थ पितृपक्षा निमित्त भांडारकर कुटुबीयांकडून | २,५०१ |
| १६. | पितरांच्या स्मरणार्थ पितृपक्षा निमित्त हितचिंतकाकडून | ५,००० |
| १७. | श्रीमती नलिनी (विमल) महाबळेश्वर शानभाग यांच्या जन्मशताब्दी निमित्त नातू श्री. चिन्मय गिरीश शानभाग यांजकडून. | १०,००१ |
| १८. | श्रीमती मीरा व श्री. गोपाळ सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र सर्वश्री मिलींद व निमीष यांजकडून. | ५,००१ |
| १९. | श्रीमती मालती व श्री. दिनकर वामन वर्टी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती रेखा मिलींद तेलंग व मीनल सतीश भुजले यांजकडून. | ५,००१ |
| २०. | श्रीमती उषा प्रभाकर फडणीस (पूर्वाश्रमीच्या स्नेहलता विश्वंभर गायतोंडे) यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. अरविंद विश्वंभर गायतोंडे यांजकडून | ३,००,००० |
| २१. | श्री. रमाकांत भवानीराव बोरक यांच्या २४ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| २२. | श्री. मधुकर वेंकटराव नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून. | २,००१ |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |
| २. | श्री. वासुदेव शांताराम राज्याध्यक्ष यांच्या जन्म शताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती विजया यांजकडून. | २५,२०१ |
| ३. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| ४. | श्रीमती शालिनी दिनकर बोरकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. मिलींद दिनकर बोरकर यांजकडून. | १,००१ |
| ५. | श्री. अनिलकुमार नीलकंठ हिचकड यांजकडून. | २५,००० |
| ६. | डॉ. नरेंद्र रामतीर्थ यार्दी यांजकडून. | ५०,००० |
| ७. | श्री. सर्वोत्तम शांताराम कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कन्यांकडून | २,००१ |
| ८. | श्री. सुब्राव विश्राम कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुतणी श्रीमती प्रतिभा विश्वास तेंडूलकर यांजकडून. | २०,००० |



# संपादकीय

## मुंबईतील मिनी कारवार, सरस्वती बागेचा शतकमहोत्सवी सोहळा उत्साहात साजरा

जोगेश्वरी येथील सरस्वती बाग म्हणजेच मुंबईतील मिनी कारवार. पु.लं. चं बालपण तिकडेच गेले. 'बालपणीचा काळ सुखाचा' या त्यांच्या हृद्य लेखांत सरस्वती बागेचे यथार्थ वर्णन आहे. या बागेला १५ जुलै २०१९ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. पावसाळ्यामुळे तेव्हा कार्यक्रम करता येणे शक्य नव्हते म्हणून त्यादिवशी फक्त सत्यनारायणाची पूजा करण्यांत आली व श्री रामेश्वर मंदिरात रात्रौ रंगपूजा साकारण्यांत आली. प्रत्यक्ष सोहळा २० ते २५ डिसेंबर या सहा दिवसांत प्रचंड उत्साहाने संपन्न झाला. Alone I can enjoy, together we can celebrate या उक्तीनुसार तेथील सर्व रहिवाशांची एकजूट त्या निमित्ताने प्रत्ययास आली.

पहिल्या दिवशी म्हणजे २० डिसेंबर रोजी सोहळ्याचे उद्घाटन झाले. आपल्या बँकेचे अध्यक्ष श्री. किशोर कुलकर्णी व सुप्रिया लाईफ सायन्स या उद्योगसमूहाचे सरस्वती बागेतच बालपण गेलेले चालक श्री. सतीश वाघ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यावेळी अस्मादिक द. ना. नाडकर्णी यांनी संपादन केलेली 'पंचकताय' ही आकर्षक स्मरणिका प्रकाशित करण्यांत आली. याप्रसंगी तिघांचाही सत्कार करण्यांत आला व त्यांनी समयोचित भाषणे केली. श्री. वाघ यांनी जाहीर केले की सरस्वती बागेत सभागृह बांधले तर आपण पाच कोटीचे साहाय्य करायला तयार आहे. त्यांचे उत्स्फूर्त निवेदन ऐकून प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर अटीतटीची अंताक्षरी स्पर्धा घेण्यात आली. त्यांत बत्तीस हौशी स्पर्धकांनी भाग घेतला होता. यावरुन रहिवाशांचा उत्साह प्रत्ययास आला. नंतर २१,२२,२३,२४ या चार दिवशी मेडीकल कँप 'एक पुलकित संध्याकाळ' अंतर्गत पु.लं.च्या काही नाटकांतील उताऱ्यांचे साभिनय वाचन, बाळगोपाळांसाठी व वरिष्ठ नागरिकांसाठी करमणुकीच्या क्रीडा स्पर्धा, महिलासाठी तोंडाला पाणी सुटणारी पाककला स्पर्धा, फॅन्सी ड्रेस व टॅलंट स्पर्धा, समूह व वैयक्तिक नृत्ये एकांकिका, लहान मुलांनी सादर केलेले पु.लं. चं 'वयम् मोठम् खोटम्' ही एकांकिका, वनिता वृंदातील महिलांनी सादर केलेली 'नवरा विकणे आहे' ही एकांकिका, 'अती तेथे माती' ही नाटुकली इत्यादी विविध कार्यक्रम झाले. 'मृद्गंध' या वाद्यवृंदाच्या कार्यक्रमाला प्रसिद्ध संगीतकार अशोक पत्की आवर्जून उपस्थित होते.

२५ डिसेंबर, क्रिसमस. कार्यक्रमाचा सहावा व शतकमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभाचा दिवस. त्या दिवशी भरलेल्या आनंदमेळाव्याला तुफान गर्दी होती. खवय्यानी चविष्ट पदार्थावर ताव मारतांना व्यासपीठावर नृत्ये सादर करण्यांत येत होती. मध्येच सांता क्लॉज, डॉनल्ड डक, मिकी माऊस पटांगणांत अवतीर्ण होताच मुलांच्या हर्षोल्हासाला पारावारच उरला नाही. अशा रीतीने सहा दिवस कसे गेले ते रहिवाशांना समजलेच नाही.

द.ना.नाडकर्णी

## एज्युकेशन सोसायटी –गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षीसे दिली जातात परंतु करोना संकटामुळे २०२० साली स्नेहसंमेलन भरवण्यात आले नाही. यामुळे गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीसे त्यांच्या घरी पाठण्याची व्यवस्था केली आहे. बक्षीसाची पात्रता पुढीलप्रमाणे

| परीक्षा | किमान पात्रता |
|---|---|
| दहावी | ८०% |
| बारावी | |
| – विज्ञान (वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| वाणिज्य | ७०% |
| कला | ६५% |
| पदवी व सरकारमान्य डिप्लोमा | ६०% |
| एम. ए. एम. कॉम, एम. एस्सी. पीएच. डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम. बी. ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी | उत्तीर्ण |
| परदेशांत घेतलेली पदवी | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जांचा विचार करील.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख २० फ्रेब्रुवारी २०२१**

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर, Email व संपूर्ण पत्ता The NKGSB Ind & Education Society Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai 400004 या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

- विद्यार्थ्यांच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबध्द असल्या पाहिजेत.
- बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एम. बी. बी. एस., जर्नेलिझम किंवा बी. कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
- ज्या डॉक्टर्सनी एम. एस. किंवा एम.डी. साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.
- गेल्या वर्षी काही परीक्षांचा निकाल उशिरा लागला होता. तेव्हा संबंधित गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनीही अर्ज पाठवावे.



| | | |
|---|---|---|
| ७. | श्री. विश्वंभर त्रिंबक कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. देवीदास यांजकडून. | १५,००० |
| ८. | श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी पुत्र श्री. पराग यांजकडून. | २५,००० |
| ९. | श्रीमती निर्मला श्रीपाद बोरकर यांजकडून ९० वा वाढदिवसाच्या प्रसंगी. | १,००,००० |

### वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |
| २. | श्री. वासुदेव शांताराम राजाध्यक्ष यांच्या जन्म शताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती विजया यांजकडून. | २५,२०१ |
| ३. | श्रीमती विमल गजानन बोरकर यांच्या ८३ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. सीताराम यांजकडून. | १०,००० |
| ४. | श्रीमती सुषमा सुबोध मुळगांवकर यांजकडून खालील व्यक्तींच्या स्मरणार्थ | |
| | श्री. सुबोध मंगेश मुळगांवकर (पती ) | २५,००० |
| | श्री. मंगेश गोविंद मुळगांवकर (सासरे) | ५,००० |
| | श्रीमती सुनीती मंगेश मुळगांवकर (सासू) | ५,००० |
| | श्री. मनोहर गोविंद मुळगांवकर (चुलत सासरे) | ५,००० |
| | श्री. प्रभाकर यशवंत तेलंग (वडील) | ५,००० |
| | श्रीमती उमाबाई प्रभाकर तेलंग (आई) | ५,००० |
| | श्री. मधुकर यशवंत तेलंग (काका) | ५,००० |
| ५. | श्रीमती गीता गोविंद गावकर व कुटुंबीयांकडून | ५०,००० |
| ६. | लेफ्ट. कर्नल रमाकांत वामन वर्टी यांच्या पहिल्या पुण्यतिथी प्रसंगी कन्या श्रीमती नीलिमा मनोज रेगे यांजकडून. | १,००,००१ |
| ७. | श्रीमती शुभदा लीलाधर सलगर यांच्या ८० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी पती श्री. लीलाधर सदाशिव सलगर यांजकडून. | ५,००० |
| ८. | श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | ११,००० |
| ९. | श्रीमती गंगाबाई त्रिंबक कसबेकर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या वर्षश्राद्धानिमित्त नातू श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | ११,००० |
| १०. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ११व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| ११. | श्री. सदानंद विश्वेश्वर नाडकर्णी यांच्या २० व्या पुण्यतिथिनिमित्त पत्नी श्रीमती मंगला यांजकडून. | २,००० |

| | |
|---|---|
| २७. श्री. दिगंबर (सूर्यकांत) नारायण तेलंग यांच्या स्मरणार्थ | |
| पत्नी श्रीमती कौमुदी यांजकडून. | ५,००,००० |
| भाचा श्री. राजस मोहन सुखटणकर यांजकडून | ५,००,००० |
| २८. डॉ. गजानन शिवराय नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मंगला यांजकडून त्यांच्या इच्छेनुसार. | ५०,१०१ |
| २९. श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २४ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ३०. यमुनाताई, सपाताई व सिंधूताई या बहिणींच्या स्मरणार्थ भाऊबीजेनिमित्त श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून. | ३,००३ |
| ३१. श्रीमती कुंदा रघुवीर देसाई यांच्यातर्फे | ५,००० |
| ३२. श्रीमती सुनीती शंकर तेलंग यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कुटुंबीय श्रीमती शीतल उदय तेलंग, सुधीर तेलंग शोभा रामाणी, मीरा प्रभूवेर्लेकर व प्रदीप यांच्यातर्फे. | ५०,००० |
| ३३. अनामिकाकडून | |
| श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांच्या ८४ व्या वाढदिवसाप्रसंगी प्रेमादरपूर्वक. | १,००१ |
| श्री. पांडुरंग (आपा) गणपत नाडकर्णी यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त | १,००१ |
| श्री. प्रभाकर नागेश नाडकर्णी यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त | १,००१ |
| ३४. श्री. जगदीश अनंत तेलंग यांच्या ८० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पत्नी श्रीमती आशा यांजकडून. | २५,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | |
|---|---|
| १. श्री. उमेश गजानन बोरकर यांच्या ६१ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ बहीण श्रीमती सुशांता (पुष्पा) शिवानंद तेलंग यांजकडून | १,००० |
| २. श्री. माधव रामदास नायक यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती मानसी अजित नायक यांजकडून. | १,००० |
| ३. श्री. गोविंद मारुती कसबेकर यांच्या ९ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून. | ३,००० |
| ४. श्रीमती स्नेहलता गोविंद कसबेकर यांच्या ६ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून. | ३,००० |
| ५. श्रीमती शकुंतला मधुकर वाघ यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. अविनाश मधुकर वाघ यांजकडून. | १,००,००० |
| ६. श्री. रामदास काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सिंधू यांजकडून. | १,५०१ |



# प्रकाशझोत

## श्री. विठ्ठल देसाई व श्री. शंकर नेत्रावळी शतकवीर

२०२० साली दोन ज्येष्ठ ज्ञातिबांधव श्री. विठ्ठल सर्वोत्तम देसाई व श्री. शंकर नीलकंठ नेत्रावळी यांनी दोन आठवड्यांच्या अंतराने शतकवीर होण्याचा मान मिळविला. उभयतांचे हार्दिक अभिनंदन.

व्हंडक्कल येथे राहणारे देसायमाम यांनी २० जानेवारी २०२० दोन जेष्ठ ज्ञातिबांध यांनी शंभर वर्षे पूर्ण केली. त्यावेळी त्यांच्या नातलगांनी व चाहत्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा शंभरावा वाढदिवस उत्साहाने साजरा केला. आपल्या संघ व एज्युकेशन सोसायटीने मुद्दाम त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देण्याची व त्यांच्याकडून आशीर्वाद घेण्याची व्यवस्था केली होती. त्यांना वार्धक्यामुळे अजिबात ऐकू येत नसले तरी वयाच्या मानाने बुद्धी तल्लख आहे. परवापरवापर्यंत ते वृत्तपत्रातील 'सुडोकू' सोडवीत होते, ते सुरुवातीला सरकारी शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले व नंतर एज्युकेशन इन्स्पेक्टर म्हणून त्यांना बढती मिळाली. त्यांच्या उमद्या स्वभावामुळे ते विद्यार्थ्यांमध्ये व सहकाऱ्यांमध्ये लोकप्रिय होते. अलीकडे देसाईमामांचे दोन ऑक्टोबर रोजी वार्धक्याने निधन झाले.

विलेपारले येथे राहणारे शंकरबाब यांना २ फेब्रुवारी २०२० रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यावेळी त्यांच्या नातेवाईकांनी पारले येथील एका सभागृहांत त्यांचा वाढदिवस उत्साहाने व प्रीतीभोजनाने साजरा केला, त्या प्रसंगी मुंबईतीलच नव्हे तर देशविदेशांतील पणतवंडासह समस्त नेत्रावळी कुटुंबीय व मित्रमंडळी आवर्जून उपस्थित होती. शंकरबाबांचे निम्मे आयुष्य नोकरीमुळे चेन्नईमध्ये गेले. निवृत्तीनंतर ते पारलेकर झाले. त्यांच्या प्रेमळ व कुटुंबवत्सल स्वभावामुळे ते सर्वांना हवेहवेसे वाटतात. त्यांच्या सत्कार समारंभाची संधी घेऊन कित्येकानी शंकरबाबांवर स्तुतीसुमनपर भाषणे व कविता केल्या. संघातर्फे श्री. मारुती दळवी यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ व एज्युकेशन सोसायटीतर्फे डॉ. विवेक कुलकर्णी यांनी स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला व आशीर्वाद घेतले.

## श्री. विलास देसाई अध्यक्ष असलेल्या अंबरनाथ जय हिंद बँकेला उत्कृष्ट नागरी सहकारी बँक म्हणून दुसऱ्यांदा पुरस्कार

दि महाराष्ट्र राज्य बँक्स असोशिएशन, मुंबई, यांनी कोंकण विभागातील १०० ते ५०० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या गटांत उत्कृष्ट नागरी सहकारी बँक म्हणून अंबरनाथ जयहिंद बँकेची निवड केली. या बँकेचे संस्थापक अध्यक्ष आहेत श्री. विलास पुंडलीक देसाई. ठाणे व पुणे दरम्यान १८ शाखा असलेल्या या बँकेने गतवर्षी सुमारे ८०० कोटी रुपयांचा व्यवसाय केला व ४.४२ कोटी रुपये नफा मिळविला. बँकेच्या ३३ वर्षांच्या कारकीर्दीत त्यांना दुसऱ्यांदा

अशा प्रकारचा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला आहे.

गेल्या पिढीतील सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील नामांकित डॉक्टर पुंडलीक देसाई यांचे श्री. विलास देसाई हे सुपुत्र होत. ते अंबरनाथ परिसरातील एक नामवंत उद्योजक आहेत. कल्याण अंबरनाथ मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (कामा) याचे ते काही वर्षे अध्यक्ष होते. जयहिंद बँकेची स्थापना त्यांनीच केली. अर्बन बँकस फेडरेशनचेही त्यांनी अडीच वर्षे अध्यक्षपद भुषविले होते.

९ एप्रिल २००६ रोजी ठाणे मंचचा वसंतोत्सव साजरा झाला तेव्हां त्यांना प्र. पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. त्यावेळी त्यांनी 'मी कारवारकरापासून दूर का राहिलो' या विषयावर विनोदी भाषण केले होते व ठाणे मंचाला २५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली. ठाणे मंचतर्फे ३ नोव्हेंबर १९९६ रोजी बार्वी धरणाजवळ एक सहल आयोजित करण्यांत आली होती. ती सहल यशस्वी करण्यासाठी देसाई कुटुंबीयांनी विशेष श्रम घेतले होते.

**'विचार वलये' हे सौ. मीरा तेलंग प्रभूवेर्लेकर यांचे पाचवे पुस्तक प्रकाशित**

गेल्या पिढींतील कारवार येथील प्रतिष्ठित व्यक्ती राव बहादूर गणपतराव तेलंग यांची सौ. मीरा प्रभू वेर्लेकर ही नात. जन्म स्थळ कारवार. शालेय शिक्षण हिंदू हायस्कूल. अर्थशास्त्राच्या पदवीधर. ललित लेखनांत विशेष रस. साधा विषयही खुलवून लिहिण्यात वाकबगार. त्या व्यक्तिचित्रे व वैचारिक लेखही प्रभावीपणे लिहितात. अनेक लेखस्पर्धामध्ये त्यांना बक्षिसे मिळालेली आहेत. २००९ सालच्या 'गोमन्त विद्या निकेतन' या प्रतिष्ठित संस्थेच्या साहित्य पुरस्काराच्या त्या मानकरी आहेत. 'रंग उगवतीचे' 'दीपकळ्या', 'आठवणींच्या पारावर' हे तीन ललितलेख संग्रह आणि 'कर्मयोगी' हा व्यक्तिचित्रसंग्रह ही त्यांची प्रसिद्ध झालेली पुस्तके आहेत. पुणे येथील 'रसिक साहित्य' या संस्थेच्या 'साहित्य सूची' या नियतकालिकासाठी गोव्याच्या साहित्य वार्ताहर म्हणून त्या काही काळ कार्यरत होत्या पणजी येथील आकाशवाणी व दूरदर्शनकेंद्रावरुन त्यांचे अनेक कार्यक्रम होत असतात. सध्या त्या गोवा मराठी अकादमी , तिसवाडी प्रभागाच्या सदस्या आहेत.

अलीकडेच त्यांचा 'विचार वलये' हा वैचारिक लेखसंग्रह प्रसिद्ध झाला. समाजातील काहीं रुढी, प्रथा, परंपरा, सामाजिक प्रश्न, नातेसंबंध, अंधश्रद्धा अशा विविध विषयासंबंधी त्यांनी आपले विचार व मते मोकळेपणाने व प्रामाणिकपणे व्यक्त केली आहेत. यातील कांही लेखांना निरनिराळ्या वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून पूर्वप्रसिध्दीही मिळाली आहे.

('विचार वलये' मूल्य रु. १५५, सौ. मीरा प्रभूवेर्लेकर, म्हापसा ९४२०२४२३९६)



| | |
|---|---|
| १२. आईवडील श्रीमती रमाबाई व श्री. नीलकंठ नारायण नेत्रावळी व आजी व आजोबा श्रीमती पार्वतीबाई व श्री. मंगेश जीवोत्तम भट यांच्या स्मरणार्थ १०० व्या वाढदिवसाप्रसंगी श्री. शंकर नीलकंठ नेत्रावळी व कुटुंबीयांकडून | १,००,००० |
| १३. श्रीमती शांताबाई व श्री. गजानन अंबाजी बोरकर यांच्या स्मरणार्थ श्रीमती शांताबाई गजानन बोरकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त पुत्र श्री. रमेश यांजकडून. | ३,००० |
| १४. काका श्री. महाबळेश्वर अंबाजी बोरकर व आत्या श्रीमती बेबी अंबाजी बोरकर यांच्या स्मरणार्थ श्रीमती शांताबाई गजानन बोरकर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी श्री. रमेश गजानन बोरकर यांजकडून | २,००० |
| १५. श्री. सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या २४ व्या पुण्यतिथीनिमित्त नाती कु. सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून. | ५,००० |
| १६. हितचिंतकाकडून | १२,००० |
| १७. श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ११ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| १८. श्रीमती गंगाबाई व श्री. काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ नाडकर्णी कुटुंबीयांकडून. | ३,००० |
| १९. श्री. अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ | |
| पत्नी श्रीमती शामला यांजकडून. | ५,००० |
| कन्या श्रीमती विद्या व जामात श्री. मनोज गो. भांडारकर यांजकडून. | ५,००० |
| २०. श्रीमती नीना (सुमन) दिगंबर कसबेकर यांच्या १९ व्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. दिगंबर मारुती कसबेकर व कन्या श्रीमती संध्या व सुजाता यांजकडून. | १,००१ |
| २१. डॉ. शांताकुमार ज्ञानेश्वर भांडारकर यांच्या स्मरणार्थ श्री. मनोज व श्रीमती मृदुला गोविंद भांडारकर यांजकडून | १,५०० |
| २२. श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून हळदीकुंकू निमित्त | २,००० |
| २३. श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| २४. श्रीमती सुजाता कसबेकर यांजकडून. | १,००१ |
| २५. श्रीमती शकुंतला मधुकर वाघ यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. अविनाश यांजकडून | १,००,००० |
| २६. पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त अनामिकेकडून. | १,१०० |

या अंकातही त्यांच्या कन्या व गोमंतकांतील एक प्रथितयश लेखिका सौ. मीरा प्रभूवेर्लेकर यांनी आपल्या आईबद्दल गुणवर्णनपर लिहिलेला लेख प्रकाशित करण्यांत आला आहे.

सुनीतीमामींच्या जन्मशताब्दीप्रसंगी त्यांचे कुटुंबीय श्रीमती शीतल उदय तेलंग, श्री. सुधीर तेलंग, सौ. शोभा रामाणी, सौ. मीरा प्रभूवेर्लेकर व श्री. प्रदीप तेलंग यांनी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ समाजसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |
| २. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| ३. | श्रीमती शांताबाई गजानन बोरकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त कन्या श्रीमती सुशांता (पुष्पा) व जावई श्री. शिवानंद शंकर तेलंग यांजकडून. | ५,००० |
| ४. | श्री. सुब्राव विश्राम कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुतणी श्रीमती प्रतिभा विश्वास तेंडुलकर यांजकडून. | ५,००० |
| ५. | वडील श्री. वसंत मंगेश दुभाषी व आत्या श्रीमती कुसुम मंगेश दुभाषी यांच्या स्मरणार्थ सर्वश्री ऋग्वेदय, पुष्पक व श्रीमती उदिता यांजकडून. | २०,००० |
| ६. | श्रीमती अनुराधा (निर्मल) बाळकृष्ण वागळे यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ बहिणींकडून. | २,००१ |
| ७. | श्रीमती वृंदा व श्री. गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ सर्वश्री आनंद व दिलीप गणपत आरस यांजकडून. | १०,००० |
| ८. | श्री. सदानंद गणपत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून. | १०,००१ |
| ९. | श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा विनायक तेलंग, श्रीमती शकुंतला व श्री. त्रिंबक महाबळेश्वर तेलंग, श्री. गोपीनाथ शिवराव वाघ, श्रीमती गोदावरी शिवराव वाघ, श्रीमती सुलभा व श्री. रामकृष्ण शिवराव वाघ, श्रीमती सुलभा व श्री रामकृष्ण शिवराव वाघ, श्रीमती स्नेहलता शिवराव वाघ, श्रीमती कमलिनी गोपीनाथ वाघ, श्रीमती प्रतिभा शरद वाघ यांच्या स्मरणार्थ श्रीमती रमाबाई व श्री. भिकप्पा विनायक तेलंग यांच्या नातवंडाकडून व श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ यांच्या मुलांकडून | ६,००० |
| १०. | श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांच्याकडून खालील व्यक्तींच्या पुण्यतिथीनिमित्त | |
| | आजोबा श्री. त्रिंबक वैकुंठ कसबेकर | १०.००० |
| | वडील श्री. विश्वंभर त्रिंबक कसबेकर | १०,००० |
| ११. | श्रीमती सुरेखा (सुमन) कमलाकर तेलंग यांच्या २ ऱ्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. कमलाकर यशवंत तेलंग यांजकडून | २,५०० |



## डॉ. महेश संझगिरी यांचा घुबडांवरील शोधनिबंध जागतिक स्तरावर सर्वोत्कृष्ट

विले पारले येथे राहणारे डॉ. महेश नारायण संझगिरी हे वन्य जीवन व पर्यावरण या क्षेत्रांतील तज्ज्ञ आहेत. अनेक प्रतिष्ठित संस्थासाठी ते सल्लागार म्हणून कार्यरत असतात. १ डिसेंबर २०१९ रोजी पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठ येथे इला फाऊंडेशनतर्फे सहावी विश्व घुबड परिषद भरली होती. अमेरिका, ब्रिटन, स्पेनसह सुमारे पन्नास देशांतील शास्त्रज्ञांनी यात भाग घेतला होता. त्यावेळी डॉ. संझगिरी यांनी सादर केलेला शोधनिबंध हा सर्वोत्कृष्ट ठरला. त्यांनी लहानपणापासूनच घुबडांच्या नोंदी केल्या होत्या व त्यांच्यात गेल्या पन्नास वर्षामध्ये वागण्यांत झालेला बदल याविषयी त्यांनी अभ्यास केला आहे. त्याच्याच आधारे त्यांनी शोधनिबंध लिहिला होता. त्यांचा निबंधाचा विषय होता. Effect of change in climate and Habitat on Owls of Mumbai from 1970 डॉ. संझगिरी यांना मिळालेला पुरस्कार कौतुकास्पद आहे.

## शर्मिला सलील नाडकर्णी ह्यांना 7th Dan Black Belt प्रदान

पुणे येथील सौ. शर्मिला सलील नाडकर्णी (पूर्वाश्रमीच्या शर्मिला रामदास हळदीपूर, श्री. रामदास वासुदेवराव हळदीपूर, कारवार ह्यांच्या जेष्ठ कन्या) ह्यांना अमेरिका येथील डॉ. मिलेज मर्फी, ९ वा दान ब्लॅक बेल्ट यांच्यातर्फे ईशिनरियू कराटेतील ६ वा दान ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आला.

सौ. शर्मिला नाडकर्णी ह्यांना क्योशि–गो (Kyoshi-go) तसेच फ्लॉरिडास्थित ईशिनरियू ब्रदरहूड ऑर्डर ह्या संस्थेकडून "ईशिनरियू ब्रदरहूड ऑर्डर होम्बू मेरिट ॲवार्ड" (IBO Hombu Merit Order Award) ने देखील सन्मानित करण्यात आले.

"क्योशि–गो" ही Master Instructor पदवी आहे तर "IBO Hombu Merit Order Award" हे परंपरागत ईशिनरियू कराटे पद्धतीचा उल्लेखनीय प्रसार करण्याबद्दल दिला जाणारा सन्मान आहे.

सौ. शर्मिला नाडकर्णी १९९२ पासून पुणे येथे कराटेचा सराव व प्रशिक्षण देत आहेत.

## ग्लोबल कॉर्पोरेट व्हेन्चरींग पॉवरलिस्ट यांच्यातर्फे ४०,००० स्पर्धकांमधून श्री. गिरीश नाडकर्णी यांना २२ वे नामांकन

लंडन येथे 'ग्लोबल कॉर्पोरेट व्हेन्चरींग पॉवरलिस्ट' या नांवाची संस्था आहे. या संस्थेतर्फे जगभरांतील नवउद्यमींना संस्थेच्या प्रस्थापित निकषांनुसार मार्गदर्शन केले जाते त्यांच्यातर्फे २०२० साली जगभरांतील सुमारे ४०,००० उद्यमींचा अभ्यास करुन त्यांची

वर्गवारी निश्चित करण्यांत आली. त्यांत पहिल्या २५ मध्ये ५ भारतीय आहेत. या यादींत श्री. गिरीश विश्वनाथ नाडकर्णी, प्रेसीडेन्ट, टोटल कार्बन न्युट्रॅलिटी व्हेन्चर्स, फ्रांस, यांना २२ वे नामांकन मिळाले.

स्टेट बॅंक ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष व संघाला लक्षावधी रुपयांच्या देणग्या देणारे एक हितचिंतक श्री. विश्वनाथ नागेश नाडकर्णी यांचे गिरीश हे सुपुत्र होत.

## डॉ. नितीन पिकळे कारवार नगरपालिकेचे नगराध्यक्ष पिकळे डॉक्टर कुटुंबीयांची हॅटट्रीक

कारवार येथील भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक डॉ. नितीन श्रीपाद पिकळे हे नोव्हेंबर महिन्यांत झालेल्या निवडणुकीत नगराध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आले. यापूर्वी त्यांचे काका डॉ. मधुकर रा. पिकळे, वडील डॉ. श्रीपाद रा. पिकळे हेही नगराध्यक्ष म्हणून निवडून आले होते. अशाप्रकारे या तिघा डॉक्टर कुटुंबीयांची नगराध्यक्ष होण्याची ही हॅट्रीक आहे.

## शुकमास्तरांनी स्थापन केलेल्या सदाशिवगड माध्यमिक शाळेचा शतकोत्तर रौप्यमहोत्सव

२ नोव्हेंबर १८९५ रोजी सदाशिवगड सारख्या ग्रामीण भागात श्री. शंकर भास्कर नाडकर्णी, परिचित नांव शुकमास्तर, यांनी तीन हिन्दू व दोन मुस्लीम अशी पाच विद्यार्थी असलेली एक माध्यमिक शाळा सुरु केली. त्यावेळी कारवार येथे एकमेव सरकारी शाळा होती. शुकमास्तरांची शाळा म्हणजे कारवारच्या परिसरांतील पहिली सर्वांत जुनी खाजगी माध्यमिक शाळा. शुकमास्तरांनी आपल्या मालकीची ही शाळा कालांतराने 'सदाशिवगड एज्युकेशन सोसायटी' या संस्थेकडे सुपुर्द केली व ते स्वत: सस्थेचे पहिले अध्यक्ष झाले.

अलीकडे २ नोव्हेंबर २०२० रोजी शाळेला १२५ वर्षे पूर्ण झाली. त्यावेळी कोविद १९ च्या पार्श्वभूमीवर साध्या पद्धतीने एक समारंभ साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगी बरेच माजी विद्यार्थी व शिक्षक आवर्जून उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार श्री. गंगाधर भट यांनी स्वीकारले. माजी अध्यक्ष व कारवारचे सेवाभावी प्रतिष्ठित नागरीक श्री. शांताराम (अरुण) कुलकर्णी हेही उपस्थित होते. उभयतांशिवाय हजर असलेल्या कांही व्यक्तींनी शालेय जीवनांतील सुखद आठवणींना उजाळा दिला. मुख्याध्यापक श्री. मुटगेकर यांनी आभार प्रदर्शनाचे भाषण केले. बहुतेकांनी नमूद केले की शहरी सुविधा उपलब्ध नसून सुध्दा ग्रामीण भागांतील याशाळेची गेल्या १२५ वर्षांतील प्रगती दैदीप्यमान आहे. शाळेचे हजारो विद्यार्थी देशात व परदेशात चमकले आहेत.

सोहळयाचे औचित्य साधून संस्थेच्या इमारतीवर आकर्षक विद्युत रोषणाई केली



## 'बेस्ट टीचर' पुरस्कार विजेते डॉ. व्ही. बी. नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी

'बिझीनेस इंडिया'या प्रथितयश प्रकाशनसंस्थेतर्फे 'एज्युकेशन वर्ल्ड' या नावाचे शिक्षण क्षेत्राला वाहिलेली एक दर्जेदार पुरवणी प्रकाशित करण्यांत येते. २००५ साली टाटा कन्सल्टिंग सर्व्हिसींस या ख्यातनाम कंपनीच्या प्रायोजनाने दरवर्षी 'बेस्ट टीचर' पुरस्कार देण्याचे ठरविले. या पुरस्कार वितरणाच्या पहिल्याच वर्षी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर शिक्षकांचा त्यांच्या योगदानाविषयी नामांकने मागविण्यांत आली. देशभरांतून आलेल्या १७९ नामांकनामधून शेवटी अंतिम निवडीसाठी झालेल्या इंटरव्हयू नंतर दोन शिक्षकांची निवड झाली व त्यांना रोख परितोषिके व 'बेस्ट टीचर' पुरस्कार विभागून देण्यांत आला त्यातील एक म्हणजे डॉ. विनायक बाबुराव नाडकर्णी.

डॉ. नाडकर्णी यांचा विषय म्हणजे झुऑलॉजी. एम्.एस्सी परीक्षेत कर्नाटक विद्यापीठातून विज्ञानाच्या सर्व शाखांतून ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. नंतर बनारस हिन्दू विद्यापीठांतून त्यांनी डॉक्टरेट मिळविली नंतर त्यांना प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या फोर्ड फाऊंडेशनची शिष्यवृत्ती मिळाली व अमेरिकेत जाऊन आणखी प्रशिक्षण घेतले. भारतांत परत आल्यावर त्यांनी कर्नाटक विद्यापीठातच अध्यापन केले व विभाग प्रमुख म्हणून निवृत्त झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वीस विद्यार्थ्यांनी पी. एच्. डी. प्राप्त केली आहे व ते सर्व देशविदेशांत उच्च पदावर कार्यरत आहेत.

कर्नाटक विद्यापीठांतील सर्व शाखांच्या डीन्सपैकी सर्वांत वरिष्ठ म्हणून तत्कालीन उपकुलगुरु निवृत्त झाल्यावर काही वेळ ते हंगामी कुलगुरु या उच्च पदावर होते. अनेक सरकारी व निमसरकारी संस्थेतर्फे त्यांनी विविध संशोधनपर प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केले.

शिक्षणक्षेत्रांतील त्यांच्या असामान्य कर्तृत्वाची दखल घेऊन आपल्या एज्युकेशन सोसायटीने २००५ साली सर्वसाधारण सभेंत सन्माननीय सभासद म्हणून त्यांना स्वीकृत करुन घेतले व नंतर झालेल्या ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनांत त्यांचा जाहीर सत्कार करण्यांत आला.

डॉ. नाडकर्णी यांचे १८ मे २०१३ रोजी निधन झाले. त्यांच्या ७ व्या पुण्यतिथीच्या प्रसंगी पुत्र श्री. मोरेश्वर व कन्या श्रीमती शारदा व जयश्री यांनी वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## सौजन्यमूर्ती श्रीमती सुनीती शंकर तेलंग यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी समाजसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी

कारवार येथील जुन्या पिढीतील एक कर्ते ज्ञातिबांधव रा. ब. गणपत शंकर तेलंग यांची स्नुषा श्रीमती सुनीती शंकर तेलंग यांची २१.१.२१ रोजी जन्मशताब्दी. सौजन्यमूर्ती व कुटुंबवत्सल म्हणून आप्तेष्टांत त्या लोकप्रिय होत्या २८जून २०१४ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांचे वृध्दापकालाने देहावसान झाले. नंतर ऑक्टोबर २०१४ च्या मुखपत्रिकेत त्यांचा नातू श्री. आदित्य रामाणी याने आपल्या प्रिय आजीबद्दल एक जिव्हाळ्याचा लेख लिहिला होता.

जन्मशताब्दी .त्या निमित्त संघ व एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यानी त्यांचा सत्कार केला. त्याचे वृत्त पृ. ५ वर आले आहे. याप्रसंगी श्री. नेत्रावळी व त्यांचे कुंटुबीय यांनी संघाच्या समाजसेवानिधीसाठी श्री. नीलकंठ नारायण नेत्रावळी व आजी आजोबा श्रीमती पार्वतीबाई व श्री. मंगेश जीवोत्तम भट यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्रीमती निर्मला बोरकर यांच्यातर्फे त्यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी वैद्यकीय सेवा निधीसाठी एक लाख रुपयांची देणगी**

पूर्वी पारले (प) येथे राहणाऱ्या श्रीमती निर्मला श्रीपाद बोरकर (पूर्वाश्रमीच्या कु. प्रेमा मंगेश पिकळे) यांना १९ मार्च २०२० रोजी ९० वर्षे पूर्ण झाली. त्याप्रसंगी त्यांच्यातर्फे वैद्यकीय साहाय्य निधीसाठी एक लाख रुपयांची देणगी मिळाली आहे. त्यांच्या सुविद्य नातीने आपल्या लाडक्या आजीबद्दल एक हृद्य कविता लिहिली आहे ती याच अंकांत प्रसिध्द करण्यांत येत आहे.

**श्रीमती नलिनी शानभाग यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी वृध्द सेवा निधीसाठी ७५,५०१ रुपयांची देणगी**

श्रीमती नलिनी महाबळेश्वर शानभाग (पूर्वश्रमीच्या कु. विमल महादेव गंडभीर) यांची १५ मे २०२० रोजी जन्मशताब्दी त्या प्रसंगी त्यांचे पुत्र श्री. गिरिश म. शानभाग यांनी वृध्दसेवानिधीसाठी आईच्या स्मरणार्थ ७५,५०१ रुपयांची देणगी दिली आहे. त्यांचा नातू श्री. मंदार जयप्रकाश देसाई यांनी आजीला आदरांजली वाहण्यासाठी एक लेख लिहिला आहे तो याच अंकात प्रसिध्द करण्यांत येत आहे.

**डॉ. गजानन शिवराय नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्याच इच्छेनुसार समाज सेवानिधीसाठी ५०,१०१ रुपयांची देणगी**

अंधेरी येथे राहणारे डॉ. गजानन शिवराय नाडकर्णी यांचे अलीकडेच १९ऑगस्ट २०२० रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या उल्लेखनीय कर्तृत्वाविषयी एक परिच्छेद मुखपत्रिकेच्या पहिल्याच अंकांत म्हणजे ऑगस्ट १९७८ मध्ये प्रसिध्द झाला होता हे विशेष. मुंबई विद्यापीठाच्या BSc परीक्षेत पदार्थविज्ञान शास्त्र या विषयांत, ते पहिल्या वर्गांत डिस्टींक्शनसह उतीर्ण झाले. MSc परीक्षेंतही त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स विषयांत प्रथम वर्गात प्रथम क्रमांक मिळविला. १९६५ त्यांनी उच्च शिक्षणासाठी परदेशी प्रयाण केले. १९७० साली लॅंकेस्टर विद्यापीठांतनू त्याच विषयांत त्यांनी डॉक्टरेट मिळविली. नंतर काही वर्षे त्यांनी टोरंटो येथे एका उद्योग समुहाच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभागाचे संचालक म्हणून काम केले. १९७८ साली ते मायदेशी परत आले नंतर जून १९७८ मध्ये वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी मुंबईतील त्यावेळची प्रतिष्ठित अशा इंस्टीटयूट ऑफ सायन्स येथे पदार्थविज्ञान शास्त्र विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली नंतर ते पुण्याला स्थायिक झाले व एका उद्योगसमुहाचे टेक्नीकल डायरेक्टर म्हणून काम केले. डॉ. नाडकर्णी यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती मंगला यांनी पतीच्याच इच्छेनुसार समाजसेवानिधीसाठी ५०१०१ रुपयांची देणगी दिली आहे



होती. शाळेच्या माजी विद्यार्थिनी व अल्पकाळच्या शिक्षिका श्रीमती कुंदा देसाई यांचा आपल्या शाळेबद्दलचा 'आठवणी दाटतात' हा एक हृद्य लेख याच अंकात अन्यत्र छापलेला आहे.

**शालान्त परीक्षेत जोगेश्वरी येथील अरविंद गंडभीर शाळेचे सतत तिसऱ्यांदा शंभर टक्के यश**

आपले ज्ञातिबांधव म्हणजे सरस्वतीचे उपासक. ते कुठेही स्थायिक झाले तरी एखादी शाळा स्थापन केल्याशिवाय त्यांना राहवतच नाही. सदाशिवगड, माजाळी, कारवार, अंकोला, अवर्सा, हळगे इत्यादी आपापल्या मूळगांवी त्यावेळच्या कर्तबगार पूर्वजांनी शाळा स्थापन केल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. १९१९ साली जोगेश्वरी येथे आपल्या ज्ञातिबांधवांनी 'मिनी कारवार' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'सरस्वती बाग' या नावाची सहकारी वसाहत स्थापन केली, तेव्हां तेथे बस्तान बसल्यावर तेथेही एक शाळा सुरु न केल्यासच नवल. एक अनुभवी शिक्षणतज्ज्ञ कै. शांताराम गणबा वर्टी व कै. महाबळेश्वर विनायक तेलंग यांच्या पुढाकाराने १९३२ साली तेथे माध्यमिक शाळेचे पहिले दोन वर्ग सुरु करण्यात आले.

१९५७ साली शाळेच्या रौप्यमहोत्सवी नव्या वास्तूचे उद्घाटन झाले. ज्ञातीतील एक उदार बांधव श्री. बाळकृष्ण गणबा गंडभीर (बुना गंडभीर) यांनी दिलेल्या भरघोस देणगीमुळे ही वास्तु साकार झाली म्हणून जोगेश्वरी इंग्लीश स्कूलचे 'अरविन्द गंडभीर हायस्कूल'असे नामकरण झाले.

गेल्या मार्च २०२० महिन्यांत झालेल्या शालान्त परीक्षेत या शाळेतील मराठी माध्यमांतील सर्वच्या सर्व म्हणजे ११८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले व शाळेला १०० टक्के घवघवीत यश मिळाले. १०० टक्के यश मिळविण्याचे हे सलग तिसरे वर्ष. विशेष म्हणजे या शाळेतले सर्व विद्यार्थी चाळींतून राहणारे वा आर्थिक दृष्टया तळागाळातील समाजाचे आहेत. या उज्ज्वल यशाचे संपूर्ण श्रेय संस्थेचे कर्तबगार अध्यक्ष श्री. मनोज फेणे यांच्या नेतृत्वाखालील कार्यकारिणीचे सेवाभावी सभासद व तनमनधन ओतून अपार कष्ट घेणारा शिक्षक वर्ग यांच्याकडे जाते.

**कारवार येथील सरकारी कॉलेज त्यांच्या गटांत भारतांत पहिल्या दहा क्रमांकाच्या आंत**

कारवार येथील गव्हर्मेंट आर्टस व सायन्स कॉलेज (GAS College) याची स्थापना १९६१ मध्ये झाली होती. श्रीमती सुमती केशव सबनीस यांच्या भरघोस देणगींतून 'श्री. केशव गजानन सबनीस' या नांवाने हे कॉलेज खाजगी स्वरुपांत साकार झाले. कालांतराने ते सरकारने आपल्या ताब्यांत घेतले व त्याला गव्हर्मेंट आर्टस व सायन्स कॉलेज असे नांव पडले.

'एज्युकेशन वर्ल्ड' तर्फे भारतांतल्या महाविद्यालयांची २०२०-२१ साला करता तीन गटांत म्हणजे १ खाजगी ऑटॉनॉमस २ सरकारी ऑटॉनॉमस व ३ बिन ऑटॉनॉमस वर्गवारी करुन नामांकन केले . यापैकी दुसऱ्या गटांतील कारवारच्या कॉलेजला पहिल्या दहा क्रमांकात नामांकन मिळाले आहे. हे समस्त कारवारकरांना अभिमानास्पद आहे. या कॉलेजच्या प्राचार्या आहेत बाड येथील न्यू इंग्लीश स्कूलच्या माजी विद्यार्थीनी डॉ. कल्पना केरवडी. गेल्या पिढीतल्या ज्या ज्ञातिबांधवांनी या कॉलेजमधून पदवी प्राप्त केली त्यांना या बातमीने नक्कीच समाधान मिळेल

**श्री. अरविन्द फेणे यांच्या दोन नातवंडांचे स्पृहणीय यश**

पारले येथे राहणारे कै. अरविन्द नरहर फेणे यांच्या दोन नातवंडानी आपापल्या क्षेत्रात स्पृहणीय यश मिळविले आहे. फेणे यांचे एक चिरंजीव श्री. सदाशिव यांचा मुलगा सोम याला प्रतिष्ठित अशा आय.आय.टी, पवई येथे मानाचे रौप्य पदक मिळाले. त्याने मेटेलर्जीकल इंजिनियरींग ॲण्ड मटीरीयल सायन्स या विषयांत एम. टेक ही पदवी मिळविली. तो पाचही वर्षे प्रथम क्रमांकाने उतीर्ण झाला होता. आय. आय.टी च्या दीक्षांत समारंभात पदार्थविज्ञान क्षेत्रातील नोबेल परितोषिक विजेते डॉ. डंकन हाल्डेन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते त्यांच्याच हस्ते सोमला रौप्य पदक प्रदान करण्यांत आले. याची क्षणचित्रे सह्याद्री वाहिनीवरुन प्रसारित करण्यांत आली होती यावरुन सोमच्या यशाचे महत्त्व समजून येते. सोमने आता मिशीगन विद्यापीठांत पी.एच.डी साठी प्रवेश घेतला आहे.

श्री. फेणे यांची कन्या सौ. उज्ज्वला संदीप देसाई यांची मुलगी निशीता ही BITS गोवा इथली पदार्थविज्ञान विषयांतील एम एस्सी. नंतर तिने अमेरिकेत जाऊन केन्टक्की विद्यापीठातून थिअॅरीटीकल फिजिक्समध्ये डॉक्टरेट मिळवली व भारतांत परतली. तिला अलीकडेच त्याच विषयांत डॉक्टरोत्तर संशोधन करण्यासाठी प्रतिष्ठीत समजली जाणारी भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळाली. आपल्या संशोधनासाठी तिने टाटा इन्स्टीटयुट ऑफ फंडामंटल रिसर्च या जागतीक कीर्तीच्या संस्थेची निवड केली व आता ती तेथे कार्यरत आहे.

**अभिनंदनीय यश**

**गौरीश महेन्द्र तेलंग** – माहीम येथील श्री. महेन्द्र जयवंत तेलंग यांचा मुलगा गौरीश हा इंडियन स्टॅटिस्टीकल इन्स्टीट्यूट चा बी. मॅथ्सचा पदवीधर. शिष्यवृत्ती मिळवून त्याने स्टोनी बुक युनिव्हर्सिटी, न्यूयॉर्क येथे एम्. एस्. सी. केली अलीकडेच तेथेच गणित विषयात तो पी. एच्. डी च्या परीक्षेत उत्तीर्ण झाला.

**डॉ. स्मिता सन्दीप वाघ** – मुलुंड येथे राहणाऱ्या सुप्रसिद्ध गायिका सौ. स्मिता व श्री. उदय मनोहर वाघ यांची स्नुषा सौ. स्मिता सन्दीप वाघ हिला अलीकडेच दिल्ली येथे 'फोकस इंडिया'



क्रमांकाचे विद्यापीठ समजल्या जाणाऱ्या एम्. आय.टी मधून एम्.एस्. ही परीक्षा उतीर्ण झाले होते. निवृत्तीसमयी ते मैसूर येथील विश्रांत टायर्स या कंपनीत टेक्नीकल डायरेक्टर होते. १९८९ साली त्यांचे निधन झाले. २०१९ हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष. त्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पत्नी श्रीमती विजया यांनी ५०४०२ रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील प्रत्येकी २५२०१ एवढी रक्कम वृद्धसेवानिधी व एज्युकेशन सोसायटी यांच्यासाठी आहे.

**श्रीमती गीता गोविंद गांवकर यांजकडून वृद्धसेवा निधीसाठी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी**

पुणे येथील श्री. गोविंद अच्युत गांवकर यांच्या स्मरणार्थ त्यांची पत्नी श्रीमती गीता यांनी २०११ साली एक लाख रुपयांची देणगी दिली होती. त्यांतील प्रत्येकी ५० हजार रुपये वृद्धसेवानिधी व एज्युकेशन सोसायटीसाठी होते. अलीकडेच श्रीमती गीता गावकर व कुटुंबीयांनी वृद्ध सेवानिधीसाठी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**डॉ. नरेन्द्र यार्दी तर्फे एज्युकेशन सोसायटीला आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी**

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकांत यार्दी बंधूंकडून एज्युकेशन सोसायटीला तीन लाख रुपयांची देणगी दिली होती याचा तपशील दिला होता. त्या तीन बंधूपैकी एक डॉ. नरेन्द्र यार्दी हे आय आय टी पवईचे डॉक्टरेट आहेत व बडोदा येथे व्यवसाय करतात. त्यांनी एज्युकेशन सोसायटीला आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री दिगंबर (सूर्यकांत) तेलंग यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दहा लाख रुपयांची देणगी**

वाळकेश्वर येथे राहणारे श्री दिगंबर (सूर्यकांत) तेलंग हे पूर्वी काही वर्षे संघाचे कार्यवाह होते. २५ जानेवारी २०१३ रोजी त्यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या पत्नी श्रीमती कौमुदी व भाचा श्री. राजस मोहन सुखटणकर यांनी प्रत्येकी पाच लाख रुपये म्हणजे एकूण दहा लाख रुपयांची देणगी समाज सेवा निधीसाठी दिली आहे.

**श्रीमती उषा फडणीस यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ चार लाख रुपयांची देणगी**

मुलुंड येथे राहणाऱ्या श्रीमती उषा प्रभाकर फडणीस (पूर्वाश्रमीच्या कु. स्नेहलता विश्वंभर गायतोंडे) यांचे जानेवारी २० मध्यें दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे बंधू श्री. अरविन्द गायतोंडे यांनी वृध्द सेवा निधीसाठी तीन लाख व बंधू अरुणकुमार गायतोंडे यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीसाठी एक लाख याप्रमाणे एकूण चार लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**श्री शंकर नेत्रावळी यांच्यातर्फे त्यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी एक लाख रुपयांची देणगी**

पारले येथे राहणारे श्री. शंकर नीलकंठ नेत्रावळी यांची २ फेब्रुवारी २०२० रोजी

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

### श्री शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही १ लाख ५३ हजार तीन रुपयांची देणगी

सदाशिवगड शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टान्झानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करुन तेथे चांगले नाव कमाविलेले श्री. शरद सलगर यांचे २०१२ साली दु:खद निधन झाले होते. यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी पतीच्या स्मरणार्थ संघाच्या समाज सेवानिधीसाठी, वृध्दसेवा निधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी देणग्या देतात. यंदाही त्यांनी प्रत्येकी ५१ हजार एक रुपये याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार तीन रुपयांची अशाच प्रकारची देणगी दिली आहे.

### ले कर्नल रमाकांत वामन वर्टी यांच्या प्रथम पुण्यतिथी प्रसंगी वृद्धसेवानिधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी

पूर्वी नाशिक येथे राहणारे लेफ्ट कर्नल रमाकांत वर्टी यांचे १७ जानेवारी २०१९ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झाले. त्या संबंधीचा एक परिच्छेद मुखपत्रिकेच्या एप्रिल २०१९ च्या अंकात प्रसिद्ध करण्यांत आला होता. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या प्रसंगी सांताक्रुज येथे राहणाऱ्या त्यांच्या सुविद्य कन्या सौ. नीलिमा मनोज रेगे यांनी आपल्या पूज्य वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्धसेवानिधीसाठी एक लाख एक रुपयांची देणगी दिली आहे. श्री. वर्टी व श्रीमती वर्टी यांनी स्वत: मागे २०११ साली वृद्धसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली होती.

### श्रीमती सुषमा मुळगांवकरतर्फे आणखी ५५ हजार रुपयांची देणगी

कारवारकरांपैकी एक प्रकांड पंडित श्री. मंगेशराव रामकृष्ण तेलंग ऊर्फ सतार मंगेशराव यांचे नातू म्हणजे श्री. प्रभाकर यशवंत तेलंग. त्यांच्या मुलुंड येथे राहणाऱ्या श्रीमती सुषमा (पूर्वाश्रीच्या वासंती) मुळगांवकर या कन्या, त्या ठाणे मंचच्या कार्यक्रमात सक्रीय असतात. सहा वर्षापूर्वी पतीच्या पहिल्या पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांनी एक लाख रुपयांची देणगी दिली होती. अलीकडेच त्यांनी वृद्धसेवानिधीसाठी आपले आप्तेष्ठ श्री. सुबोध मंगेश मुळगांवकर (पती रु २५,०००), श्री. मंगेश गोविंद मुळगांवकर (सासरे रु. ५,०००) श्रीमती सुनीती मंगेश मुळगांवकर (सासू रु. ५०००) श्री. मनोहर गोविंद मुळगांवकर (चुलत सासरे रु, ५,०००) श्री. प्रभाकर यशवंत तेलंग (वडील रु. ५,०००) श्रीमती उमाबाई प्रभाकर तेलंग (आई रु. ५,०००), श्री मधुकर यशवंत तेलंग (काका रु. ५०००) असे एकूण ५५ हजार रुपये देणगी म्हणून दिले आहेत.

### श्री. वासुदेव शांताराम राजाध्यक्ष यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी ५०४०२ रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव शांताराम राजाध्यक्ष गुणवत्तेत जगांत पहिल्या



प्रायोजित ग्लोबल लीडरशिप प्रॉग्रॅम अंतर्गत सर्वात कर्तबगार फिझियोथेरपिस्ट म्हणून मानाचा पुरस्कार मिळाला. ती मगरपट्टा पुणे येथे प्रॅक्टीस करते.

**अर्णव अतुल कसबेकर** – आपल्या संघाचे एक हितचिंतक श्री. अरुण भास्कर कसबेकर यांचा कर्तबगार मुलगा म्हणजे सुप्रसिद्ध छायाचित्रकार श्री. अतुल कसबेकर. अतुलचे चिरंजीव अर्णव यांने मुंबईत बारावी परीक्षा उत्तीर्ण केल्यावर प्रख्यात न्यूयॉर्क फिल्म अॅकेडमी मध्ये प्रवेश घेतला. तो लॉस एंजेलीस येथे प्रशिक्षण घेत आहे. तेथील कसोटींत त्याला ३०८ ही अत्युच्च ग्रेड मिळाली. त्याच्या सर्वांगीण नैपुण्याबद्दल त्याचे नांव डीन्स लिस्ट मध्ये अंतर्भूत करण्यांत आले. अमेरिकेतील अभ्यासपद्धतीनुसार डी लिस्ट मध्ये नाव झळकणे हे फार प्रतिष्ठेचे समजले जाते.

**अर्णव आशुतोष तेलंग** – पारले येथे राहणारे श्री. आशुतोष जगदीश तेलंग यांचा मुलगा अर्णव याने अकरावीत असतांना आपल्या मित्राबरोबर स्वयंस्फूर्तीने मुंबई–पुणे सायकल वारी पूर्ण केली. दर सुट्टीत सायकलने दूर नवनवीन ठिकाणी जाण्याचा त्यांचा आवडीचा छंद आहे. २८ डिसेंबर २०१९ रोजी पारलेश्वर मंदिराकडून पहाटे साडेचार वाजता निघून संध्याकाळी साडेसात वाजता पुण्याच्या श्रीमंत दगडू शेठ गणपती मंदिराजवळ पोचले. दोन स्थानिक मासिकांतून त्याला त्याबद्दल प्रसिद्धी मिळाली. घरबसल्या मोबाईलशी चिकटून राहाण्याच्या आजच्या जमान्यात अर्णवचा हा छंद नक्कीच कौतुकास्पद आहे.

**कु. संजना राजीव वागळे** – दादर येथे राहणारे सौ. मीना व श्री. राजीव दिनकर वागळे (अॅडव्होकेट) यांची कन्या संजना ही कॅनबेरा येथील ऑस्ट्रेलियामधील नॅशनल युनिव्हर्सीटीची मास्टर्स इन् इंटरनॅशनल मॅनेजमेंट ही परीक्षा डिस्टींक्शनसह उतीर्ण झाली. तिची मोठी बहीण सानिका हिने इंग्लंडमध्ये वॉर्विक युनीव्हर्सिटीतून मास्टर्स इन् क्रिएटीव्ह अँड मिडीया एन्टरप्राईझ ही पदवी मिळविली आहे. दोघीही आता अनुक्रमे ऑस्ट्रेलिया व कॅनडा येथे वास्तव्याला आहेत.

**कु. आर्या मोहन सबनीस** – सविता सबनीस फाऊंडेशनच्या नावे संघाला सातत्याने देणग्या देणारे एक हितचिंतक श्री. किशोर वासुदेव सबनीस यांची सिंघानिया स्कूलमधील ११ कॉमर्सची विद्यार्थिनी कु. आर्या मोहन सबनीस ही अभ्यासाव्यतिरीक्त इतर क्षेत्रातही निपुण आहे. मागे तिला डॉ. होमी भाभा बाल स्पर्धेत ६ वीत असतांना सुवर्ण पदक व १०वीत असतांना रौप्य पदक मिळाले होते. अलीकडे दै. लोकसत्ता तर्फे 'वक्ता दशसहस्रेषु' या गाजलेल्या स्पर्धेत ठाणे येथील प्राथमिक फेरीत पहिल्या फेरीत ती पहिल्या सहात आली. नंतर ठाण्यामध्येच अंतिम फेरीत तिचा तिसरा क्रमांक आला.

पुढील मजकूर ३५ वर

## सदाशिवगड माध्यमिक शाळेचा शतकोत्तर रौप्यमहोत्सव

### ‘आठवणी दाटतात’

रस्त्याच्या कडेकडेने जाताना
लक्ष जाते शाळेच्या घणघणणाऱ्या घंटेकडे
पाय किंचित थबकतात, मन रेंगाळते
मला आठवते ती माझी शाळा
सदाशिवगड हायस्कूल सदाशिवगड
२ नोव्हेंबर २०२० ला माझ्या शाळेला १२५ वर्ष झाली.
आज सोनियाचा दिन खरा
जुन्या आठवणींना पंख फुटले मन फुलपाखरासारखे
सैरभैर झाले समोर तरळली ती माझी शाळा

याच शाळेत मी शिकले बाई म्हणून एक वर्ष माझ्या शाळेत नोकरी केली. माझ्या वयाच्या उत्तररंगी मला सर्व आठवले माझे बालपण. गडावर मावशीकडे म्हणजे ‘माई’ कडे गेले कै. शंकर भास्कर नाडकर्णी म्हणजे ‘शुकबाप्पा’ होय, माझ्या माईचे यजमान. आम्ही त्यांना ‘बाप्पा’ म्हणत असू. आजही ते ‘शुकबाप्पा’ याच नावाने सर्वांना परिचित आहेत. माझा विवाह सुधाकर ऊर्फ रघुवीर देसाई यांच्याशी होईपर्यंत मी त्यांच्याच घरी वाढले. आज समाजात मला जो नावलैकिक मिळाला तो बाप्पांचा कृपाप्रसाद होय. त्यांनी २ नोव्हेंबर १८९५ साली शाळेची स्थापना केली. आमच्या घराजवळ कन्नड शाळा अन् माझी शाळा होती. त्यामुळे पहिली घंटा होण्यापूर्वी मी माझ्या मावसभावंडां बरोबर शाळेत जात असू.

मला आठवते शाळेचे मुख्याध्यापक सलगर सर होते. उंचपुरे, डोळ्यावर चष्मा अन् सफारी वेषात असायचे. आमची बोली भाषा कोंकणी त्यामुळे शाळेत तासाला ही आम्ही आपआपसात कोंकणीतून बोलायचे. परंतु सर अस्खलित मराठीतूनच आदरार्थी बोलायचे. त्यावेळी मी बरीच अवखळ होते. पहिल्या बेंचवर मी माझी मैत्रीण विजया वैकुंठ नाडकर्णी बसत असू . मी थोडीशी चुळबुळ केली की सर स्पष्ट शब्दात ओरडायचे, ‘मिस नाडकर्णी उठा व मागच्या बेंचवर बसा.’ आता या क्षणी मला सर्व आठवते.

संस्कृत अन् मराठीसाठी ‘फेणे सर’ होते. त्यांचा दरारा व नजरेचा धाक खूप मोठा होता. मी मात्र त्यांना खूप घाबरायची. संस्कृत, मराठी विषय ते तन्मयतेने शिकवायचे आज मी मराठीतून उत्तम पुस्तके लिहिली. संस्कृत भाषेवर माझे प्रभुत्व आहे. त्यामुळेच ‘गीते’ वर मला एम्. ए होता आले ही सरांची कृपा होय.



| | | |
|---|---|---|
| यशवंत शिवराम तेलंग | (हारवाडा) | पुणे |
| मंगला आत्माराम वैद्य | (यल्लापूर) | माहीम |
| सुहासिनी विश्वेश्वर (अचा) वाघ | (सदाशिवगड) | खार |
| शकुंतला मधुकर वाघ | (सदाशिवगड) | गांवदेवी |
| सदानंद मंगेश वाघ | (सदाशिवगड) | प्रभादेवी |
| अरविन्द (अरु) मंगेश वाघ | (सदाशिवगड) | चेम्बूर |
| राजेश गजानन वाघ | (सदाशिवगड) | नेरुळ |
| शेखर गजानन वाघ | (सदाशिवगड) | ठाणे |
| पांडुरंग काशिनाथ वाघ | (सदाशिवगड) | जोगेश्वरी |
| जगदीश गोविन्द वाघ | (सदाशिवगड) | नलासोपारा |
| महेश्वर भास्कर वागळे | (बाड) | कळवा |
| श्रीकान्त मनोहर वागळे | (बाड) | अंबरनाथ |
| अरुण गणपत वागळे | (बाड) | पारले |
| महारुद्र (माधव)दत्तात्रय वागळे | (बाड) | लंडन |
| सुलभा विवेक वागळे | (बाड) | गोरेगांव |
| सुगंधा (सुमन) घनश्याम वागळे | (अस्नोटी) | पारले |
| आनंद महारुद्र वागळे | (माजाळी) | दादर |
| विश्वनाथ (उदय) दिगंबर वागळे | (माजाळी) | डोंबीवली |
| कृष्णा मारुती वागळे | (माजाळी) | कांदिवली |
| शोभना (सुशीला)घनश्याम वागळे | (माजाळी) | अंधेरी |
| शंकर मंजुनाथ (जिवमाम) वागळे | (माजाळी) | वांन्द्रे |
| सुरेश नीळकंठ वागळे | (अस्नोटी) | जोगेश्वरी |
| प्रभाकर सत्येन्द्रनाथ (कोरु) वागळे | (बाड) | नाशिक |
| * गीता (मंदा) शांताराम वागळे | (बाड) | परळ |
| राजाराम गणपत वागळे | (बाड) | ठाणे |
| गणपत नारायण वागळे | (माजाळी) | गोरेगांव |
| गुरुनाथ (प्रमोद) दिनानाथ वर्टी | (सदाशिवगड) | मुलुंड |
| वैशाली वामन वर्टी | (बाड) | नाशिक |
| प्रमोद (नंदू) वामन वर्टी | (बाड) | प्रभादेवी |
| निर्मला प्रमोद वर्टी | (बाड) | प्रभादेवी |

*** गीता वागळे यांनी देहदान केले आहे.**

| | | |
|---|---|---|
| विनायक सखाराम पालेकर | (बाड) | जांभुळपाडा |
| मनीषा (सुनंदा) मधुसूदन पालेकर | (बिणगे) | गिरगांव |
| नारायण मंगेश पालेकर | (अर्गे) | मालाड |
| मोहन गणपत पालेकर | (बाड) | गोरेगांव |
| श्रीधर नागेश पालेकर | (बाड) | बंगळूर |
| माधव कृष्णा पालेकर | (कडवाड) | परळ |
| अमीत विनायक (जगदीश) पालेकर | (अर्गे) | गिरगांव |
| श्रीपाद लक्ष्मण पिकळे | (अंकोला) | मुलुंड |
| पुष्पमाला मधुकर पिकळे | (अंकोला) | सांताक्रुज |
| अशोक भवानीशंकर पिकळे | (अकोला) | विरार |
| श्रीपाद रामचंद्र पिकळे | (अंकोला) | कारवार |
| उषा प्रभाकर फडणीस | | |
| (पूर्वाश्रमीच्या स्नेहलता विश्वंभर गायतोंडे) | (हळगे) | मुलुंड |
| चैताली प्रकाश रंगनहळ्ळी | | |
| (पूर्वाश्रमीच्या शांता बाळप्पा (सदाशिव) बोरकर) | (कोडीबाग) | बेळगांव |
| दुर्गादास विठ्ठल रामाणी | (व्हडले बाग) | ताडदेव |
| उल्हास कृष्ण साखरदांडे | (हळगे) | गोरेगांव |
| सुहास यशवंत संजगिरी | (गांवगेरी) | ठाणे |
| शीला दत्ताराम सुखटणकर | | |
| (पूर्वाश्रमीच्या कांता सुबराव तेलंग) | (नंदव्हाळ) | वान्द्रे |
| रमेश बाबुराव तेलंग | (हारवाडा) | जोगेश्वरी |
| सुरेश बाबुराव तेलंग | (हारवाड) | ठाणे |
| मधुकर मर्तोबा तेलंग | (केरवडी) | केरवडी |
| उमेश मर्तोबा तेलंग | (केरवडी) | ठाणे |
| शुभदा (शरद) गोविंद तेलंग | (केरवडी) | माहीम |
| पुरुषोत्तम भवानी तेलंग | (केरवडी) | भांडुप |
| इंदिरा (लीला) पुरुषोत्तम तेलंग | (केरवडी) | भांडुप |
| नितीन विश्वनाथ (मोहन) तेलंग | (बाड) | अंधेरी |
| सर्वोत्तम नारायण तेलंग | (बाड) | बंगळूर |
| माधुरी (कुंदा)सर्वोत्तम तेलंग | (बाड) | बंगळूर |
| दीनानाथ भवानीशंकर तेलंग | (हारवाडा) | अमेरिका |



'गणपत मास्तर' हे सर्वांचे आवडते शिक्षक. इतिहास, भूगोल उत्कृष्ट शिकवायचे. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक गड, किल्ले मी पालथे घातले अन् अनेक दिवाळी अंकातून लेखन केले. माझे वास्तव्य मावळ तालुका लोणावळा इथे गेली ६० वर्ष आहे. ते सर अतिशय हळवे अन् प्रेमळ होते. पेपरात गुण ही छान द्यायचे.

माझ्या नजरे समोर तरळतात ते व्हायोलिन वाजविणारे 'सहस्रबुध्दे' मास्तर अन् कवायत घेणारे 'नाईक' मास्तर. सहस्रबुध्देसर 'चित्रकला' विषय शिकवायचे त्यांच्यामुळेच मला चित्रकलेची गोडी लागली व मी इंटरमिजिएट परीक्षा दिली.

व्ही. यू. देसाईसर हिन्दी विषय शिकवायचे. ते अत्यंत शिस्तप्रिय होते. त्यांच्या आशीर्वादाने मी साहित्य रत्न, सा. विशारद, सा. पंडित आणि हिन्दीशिक्षक सनद परीक्षेत यश संपादन केले.

आर. एन. डी. सर म्हणजे देसाईसर. ते शास्त्रविषय व गणित विषय शिकवित असत. पुढे त्यांच्याशी विवाह झाला अन् मी लोणावळ्याला आले. लोणावळ्यात ऑक्झिलियम कॉन्व्हेंट, व्ही. पी. एस्. प्रशाला अन् डी. पी. मेहता सायन्स अन् वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात मिळून मी ३५ वर्ष नोकरी केली. माझे पती आय्. एन्. शिवाजी लोणावळा अर्थात भारतातील सर्वात मोठ्या 'नाविक दल' मध्ये सैनिक प्रशिक्षण कॉलेजात कार्यरत होते.

मला आठवतात ते 'अनंत प्रभु' मास्तर, 'कमलाकर प्रभु' आणि 'अंबाबाई वाघ' आमच्या शाळेत तसे अनेक हंगामी तरुण मास्तर आले. त्यामुळे सुरेश नाडकर्णी, शशिकांत फेणे, विश्वेश्वर सुखठणकर अन् अनेक होतकरु तरुण मंडळी होती.

शाळेत, 'सरस्वती महोत्सव' आणि 'गॅदरिंग' दणक्यात साजरे केले जायचे. आम्ही मुले मुली रांगोळ्या व सजावट करीत असू. मला आठवते 'नवीन कल्पना' नाटक बसवले होते. त्यात माझी नोकराची प्रमुख भूमिका होती. सुरैय्यानटीच्या गाण्यावर मी नृत्य केले होते अन् शिवाजी स्कूलच्या मुख्याध्यापकांनी १० रु चे बक्षिस दिले होते. आज हे सर्व वयाच्या ८४ व्या वर्षी सर्व आठवते.

वरील सर्व शिक्षकांनी अन् बाप्पांनी मला घडविले. या सर्वांचा लेखिका, कवियत्री अन् आदर्श शिक्षिका म्हणून जो समाजाकडून सर्वांकडून सन्मान मिळाला त्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आईवडील आणि या सर्व परमपूज्य बाप्पामाई अन् गुरुवर्य यांचे ऋण या जन्मीतरी मला फेडता येणार नाही.

१२५ व्या शाळेच्या भव्य वाढदिवसासाठी अनेक शुभेच्छा. माझ्या गुरुचरणी ही शब्दफुलांची ओंजळ समर्पित.

**कुंदा र. देसाई**
**९८१९०५२३१९**

## ठाणे मंच तर्फे आयोजित वार्षिक सहल

आतुरतेने वाट पहात असलेल्या वार्षिक सहलीचा आनंद लुटण्या करिता रविवार, दि. १२ जानेवारी चा दिवस उजाडला.

पश्चिम मुंबईहून दोन आणि मुलुंड–ठाणे मार्गे एक अशा तीन बसीस सर्व ज्येष्ठ व तरुण तरुणींना घेऊन सकाळी ९.१५ वा कृष्णा रिसॉर्टवर पोहोचल्या. तिथे नाश्ता तयार होता. सर्वांनी त्याचा मनसोक्त आनंद घेतला.

त्यानंतर श्री. सुरेश पालेकर यांनी आलेल्या सर्वांचे स्वागत केले. जोगेश्वरी बसचे मोनीटर प्रसाद गायतोंडे आणि माटुंगा बसचे मॉनीटर अरुण बोरकर व रवींद्र बोरकर यांनी सर्वांना एकत्र करुन व चहा–बिस्कीटे देऊन आणल्या बद्दल त्यांचे आभार मानले. त्यानंतर त्यांनी सर्व नवीन ठाणे मंच समिती सदस्यांची ओळख करुन दिली. काही जण थोड्याच अंतरावर असलेल्या जैन मंदिराला भेट देण्यास गेले. इतर लोकांनी झाडांच्या सावलीत खुर्च्या टाकून छान अंताक्षरी गरबा वगैरेंचा आनंद लुटला.

त्या नंतर लता नायर यांनी "ऐ मेरी जोहरा जबी" हे गाणे तसेच कोकणी गाणे सादर केले. नंतर रवी बोरकर यांनी मराठी गाणी, हेमा कुलकर्णी व देवदास नाडकर्णी यांनी कविता व तारा मावशी गायतोंडे यांनी पोवाडा सादर केला.

तदनंतर कु. तेजश्री कुलकर्णी हिने "तेरे मस्त मस्त नैन" ज्योती सुखटणकर यांनी "जीया ले गयो रे मोर सावरिया" हे गाणे, मेधा सोहोनी हिने "तुला पाहते रे" आणि "मिले सुर मेरा तुम्हारा" ही दूरदर्शन वरील शीर्षक गीते सादर केली. सुहासिनी नाडकर्णी यांनी "रक्तदान" याविषयी सविस्तर माहिती दिली. श्रीमती निशा पिकळे यांनी उत्स्फूर्त पणे निवेदनाची बाजू हाती घेतली. सर्वांनी मिळून दुपारच्या शाकाहारी/मांसाहारी जेवणाचा आस्वाद घेतला. थोड्याशा विश्रांतीनंतर श्री. अरुण कसबेकर यांनी सारस्वत ज्ञातीतील ज्येष्ठ नागरिकांना उतार वयात येणाऱ्या अडचणीचा आढावा घेऊन त्यांच्यासाठी उपयुक्त व सर्व सुखसोईनी उपलब्ध अशा Senior Citizen Joy Centre ची स्थापना सदाशिवगडावर करण्यात येऊ शकते. तसेच कारवार येथे रेल्वे स्टेशन नजीक असलेल्या भूखंडावर हॉलीडे होम वगैरेची व्यवस्था आपण करु शकतो असे विचार मांडले.

त्यानंतर संगीत खुर्चीचे आयोजन आणि Passing the Parcel हे खेळ झाले. श्री. बाळा (प्रशांत) व सौ. शुभदा कसबेकर संगीत खुर्चीची विजेता ठरली तर Passing the Parcel चा विजेता कुमार त्रिनल पाईन व मेधा सोहनी उप. विजेती ठरली.

चहा पानानंतर तारा मावशी गायतोंडे व दुर्गादास रेगे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. सहल यशस्वी होण्यासाठी ज्यांनी सक्रीय मदत केली त्यांनाही पारितोषिके देण्यात आली. ठाणे मंचास दुवा देत सर्वजण परतीच्या प्रवासासाठी आपापल्या बसमध्ये बसले.

**अरुण सदाशिव रेगे - मुलंड**
**९८६९०४५४६४**



| | | |
|---|---|---|
| शैला सुभाष (दीपक) कसबेकर | (खारगे) | ग्रांटरोड |
| दत्तात्रय भवानी कसबेकर | (कडवाड) | पारले |
| दयानंद विठ्ठल कसबेकर | (कडवाड) | पारले |
| दुर्गाप्रसाद दत्तात्रय कसबेकर | (कडवाड) | माहीम |
| सुहासिनी अरविन्द कसबेकर | (कडवाड) | माहीम |
| शांता श्रीकांत कसबेकर | (कडवाड) | धारवाड |
| रत्नाकर जयवंत कुलकर्णी | (हळगे) | प्रभादेवी |
| नीलम शांताराम (अरुण) कुलकर्णी | (हळगे) | कारवार |
| जगदीश दिगंबर कुलकर्णी | (हळगे) | बोरीवली |
| रमेश जयवंत कुलकर्णी | (हळगे) | शिवडी |
| दयानंद सदाशिव कुलकर्णी | (हळगे) | बोरीवली |
| सुधा दयानंद कुलकर्णी | (हळगे) | बोरीवली |
| विजया महाबळेश्वर (अनंत) मुझुमदार | (अंकोला) | चेम्बूर |
| महाबळेश्वर (अनंत) दत्तात्रय मुझुमदार | (अंकोला) | चेम्बूर |
| विद्याधर विठ्ठलराव मुझुमदार | (अंकोला) | वान्द्रे |
| प्रतिभा कमलाकर मुझुमदार | (अंकोला) | बेळगांव |
| हीरा बाळकृष्ण मुझुमदार | (अंकोला) | कांदिवली |
| सविता मंगेश मुझुमदार | (अंकोला) | पारले |
| सविता गंगाधर मिटबंदर | (अंकोला) | अमेरिका |
| प्रभाकर नागेश नाडकर्णी | (सांवरपै) | बंगळूर |
| भास्कर मर्तोबा नाडकर्णी | (सांवरपै) | पारले |
| पांडुरंग (आपा) गणपत नाडकर्णी | (सांवरपै) | पुणे |
| सविता दिनानाथ नाडकर्णी | (हाणकोण) | जोगेश्वरी |
| वसंत मनोहर नाडकर्णी | (सांवरपै) | कुर्ला |
| रामचंद्र (किशोर) आनंद नाडकर्णी | (अंकोला) | अमेरिका |
| गजानन शिवराय नाडकर्णी | (मल्लापूर) | अंधेरी |
| स्मिता विजय परुळेकर | | |
| (पूर्वाश्रमीच्या उषा गणपत नाडकर्णी) | (सांवरपै) | जोगेश्वरी |
| रेखा अनिल पाटकर | (शिरसी) | अंधेरी |
| (पूर्वाश्रमीच्या रेखा नारायण करुर) | | |
| सुनंदा विनायक पावशे | (बाड) | बोरीवली |

## निधन

| | | |
|---|---|---|
| शिवानंद (मनोहर) विरुपाक्ष आरस | (अंकोला) | वरळी |
| विजयालक्ष्मी बानोडकर | | |
| (पूर्वाश्रमीच्या विजयालक्ष्मी शंकर बोरकर) | (कोणे) | डोंबिवली |
| विजयानंद दिनकर बोरकर | (कडवाड) | बोरीवली |
| अर्चना (चारुलता) अनिल बोरकर | (मल्लापूर) | पारले |
| प्रेमानंद त्र्यंबक बोरकर | (कडवाड) | नेरुळ |
| इंदिरा सदानंद बोरकर | (कडवाड) | शिवाजी पार्क |
| सुमन माधव बोरकर | (चेंडिये) | प्रभादेवी |
| रमाकांत (दिगंबर) शंकर बोरकर | (कोडीबाग) | माहीम |
| जगदीश शंकर बोरकर | (कोडीबाग) | धारवाड/माहीम |
| दिलीप महाबळेश्वर (बाबू)ब्रह्मे | (सदाशिवड) | जोगेश्वरी |
| हीरा महारुद्र देसाई | (व्हंडक्कल) | अंकोला |
| विठ्ठल सर्वोत्तम देसाई | (व्हंडक्कल) | व्हंडक्कल |
| रमाबाई कमलाकर देसाई | (व्हंडक्कल) | व्हंडक्कल |
| सुरेश भवानीशंकर देसाई | (कडवाड) | कांदिवली |
| मालिनी मधुकर देसाई | (कडवाड) | पारले |
| दुर्गा (ललिता) शिवानंद देसाई | (हन्नळ्ळी) | अमेरिका |
| शैलजा (लीला) भवानी देवीमने | (शिरसी) | पुणे |
| विमल परमानंद दिवेकर | (केरवडी) | गिरगांव |
| नारायण शांताराम दिवेकर | (केरवडी) | वान्द्रे |
| अनीता विनायक दिवेकर | (कणसगिरी) | पुणे |
| पद्माकर रामचंद्र दुभाषी | (कारवार) | पुणे |
| सदानंद काशिनाथ गायतोंडे | (किन्नर) | बडोदा |
| पुष्पा सदानंद गायतोंडे | (किन्नर) | बडोदा |
| मंगला मारुती (बाबूसर) गायतोंडे | (हळगे) | जोगेश्वरी |
| प्रमिला प्रभाकर गायतोंडे | (हळगे) | माहीम |
| माणिक मधुकर गायतोंडे | (अस्नोटी) | पुणे |
| उषा विनोद गायतोंडे | | |
| (पूर्वाश्रमीच्या विनोद मंगेश मुझुमदार) | (अंकोला) | बोरीवली |
| मीरा भालचंद्र गायतोंडे | (हळगे) | माहीम |
| प्रभाकर शांताराम कामत | (कारवार) | माहीम |



## "पंचकताय्"

### जोगेश्वरी येथील सरस्वती बागेच्या शतकमहोत्सवी वर्षाची संग्राह्य स्मरणिका

जोगेश्वरीतली सरस्वती बाग जिला आपण 'सोसायटी' म्हणतो आणि कौतुकाने 'मिनी कारवार' म्हणून ओळखतो, तिच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्ताने डिसेंबर महिन्यात प्रकाशित झालेली 'पंचकताय' ही स्मरणिका हाती आली. पूजेनंतर वाटण्यात येणारा पंचखाद्याचा प्रसाद, त्याचे 'पंचकताय' हे खास कारवारी नांव आणि त्यातील च या अक्षराच्या उच्चाराची ढब देखील अच्च कारवारीच पंच मधला 'च' चा उच्चार हा संस्कृत किंवा मराठीप्रमाणे नसून चटई च्या 'च' सारखा, 'पंचकताय' या पौष्टिक आणि खमंग प्रसादाशी श्री रामेश्वराच्या देवळाच्या सान्निध्यात वस्ती करुन राहिलेल्या कारवारी कुटुंबाचा भावनिक संबंध जोडण्याचे काम या शीर्षकाने केलेले आहे.

२० व्या शतकाच्या सुरवातीला कारवारहून पोटापाण्यासाठी मुंबईत आलेल्या गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीतील कारवारकरांच्या स्थलांतराचा इतिहास या स्मरणिकेत आहे. ही मध्यमवर्गीय कुटुंबे सुरवातीला गिरगावातल्या चाळीत येऊन राहिली खरी, पण त्यांना आपल्या गावातले मोकळे ढाकळे वातावरण आणि या शहरी घरातली फूटपट्टीच्या मापावरची मर्यादा यातला फरक वारंवार जाणवून यायचा.

आपल्या ज्ञातिबांधवांची गरज ओळखून मुंबईत अगोदर येऊन उद्योगधंद्यात, व्यापारात, सरकारी नोकरीत स्थायिक झालेल्या शेठ शांताराम कुलकर्णी, वामन मंगेश दुभाषी (पु.लं. चे आजोबा), व्ही. डी. मुझुमदार, नरहरी वागळे इत्यादी समाजातील धुरीणांनी पुढाकार घेऊन १९१९ साली या 'सोसायटी'ची स्थापना केली. ही स्थापना, त्यानंतर मुंबई शहरा लगत असलेल्या जोगेश्वरी सारख्या गावठाणाची योग्य निवड करुन तेथील सुमारे १५ एकर जमिनीची खरेदी करण्यात आली. त्यापाठोपाठ रहिवाशांसाठी त्याकाळानुसार आधुनिक निवास बांधण्यात आले. त्यांची धार्मिक आणि आध्यात्मिक गरज जोपासण्यासाठी श्री रामेश्वर मंदिर, सद्भक्ती मंदिर बांधण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी 'सरस्वती मंदिर' आणि तेथील शेठ शांताराम हॉल, शाळा, सार्वजनिक गणेशोत्सव वगैरे उपक्रमांनी 'सोसायटी'ची होत गेलेली प्रगती या सर्वांचा साद्यंत इतिहास श्री. उदय नाडकर्णी, अरुण विजयकर, अशोक सोहोनी यांनी आपल्या लेखांतून लिहिला आहे.

आपल्या आयुष्याची सुरवात सरस्वती बागेत झाल्यापासून तेथील बालपणीच्या सुखाच्या काळात खेळलेले मोकळ्या मैदानातले, झाडावरचे, घराबाहेरील ओट्यावर बसून खेळलेले बैठे खेळ, शाळा, अभ्यास, सण-उत्सव सादर केलेली नाटके, ऑर्केस्ट्रा याबद्दलचे उदय नाडकर्णी, किरण कामत, अरुण विजयकर, डॉ. रमेश सलगर इत्यादिकांचे रंजक लेख वाचून आपणही त्या काळात वावरतो आणि एकीकडे दाट वस्तीत लहानाचे मोठे झालेल्या आमच्यासारख्या शहरी मुंबैकरांना त्यांचा हेवा वाटू लागतो. खरोखरच अगदी आदर्श बालपण, तारुण्य आणि आता आयुष्याची संध्याकाळ ही माणसे सोसायटीत राहून कृतार्थतेने व्यतीत

करीत आहेत, सोबत इतका समृद्ध ठेवा जवळ बाळगून.

याशिवाय विद्या धुमे, मीनल कुलकर्णी, नयना पिकळे यांचे लेख सरस्वती बागेतल्या अस्सल कारवारी वातावरणात फिरवून आणतात. तेथील बंदुकधारी पहारेकरी, रामा प्लंबर, कल्हईवाला, मासे विकणारा आबा, तिसऱ्या, कालवे आणणाऱ्या कोळणी, रात्री येणारा कुल्फीवाला, धार्मिक समारंभात पिढयान पिढया फुले, केळीची पाने पुरवणारे माळी या सर्वांचे शब्दचित्र हुबेहुब रेखाटतात. सगळ्यात गम्मत म्हणजे सोसायटीतल्या कौलारु घराबाहेरच्या आटोपशीर ओट्याबद्दल सांगताना नयना पिकळे म्हणतात, "घरातल्या माणसांइतकाच किंबहुना त्यांच्यापेक्षाही जिवंत असा हा ओटा म्हणजे सारस्वतांचं जणू दुसरं घरच" एकदा का पुरुषमंडळी डबा घेऊन हापिसात गेली, की बायका आपापली घरची कामे करायला ओट्यावरच ठाण मांडायच्या. तांदूळ, कडधान्ये निवडणे, भाज्या निवडणे-चिरणे, झालंच तर विळीवर मासे साफ करणे, फुलांच्या वेण्या (फात्यो) गजरे गुंफणे ही सगळी कामे शेजारणींच्या सोबतीने व्हायची. उन्हाळ्यातली पापड लाटणे, सांडगे घालणे ही कामे देखील एकमेकींच्या सहकार्याने ओट्यावरच व्हायची; त्यात मुलां-मुलींची लुडबूड असायचीच. मग पापडाच्या लाट्या, सांडग्याचे पीठ यांच्या मोबदल्यात हीच बच्चे कंपनी हातात काठ्या घेऊन राखणदारीची जबाबदारी घ्यायची. या ओट्यावरच बायकांच्या 'पंचायत्या' रंगायच्या आणि त्यातून सोसायटीतल्या यच्चयावत् बातम्या मिळायच्या.

या सगळ्या रम्य अशा आठवणींत रमत असतानाच काही आठवणी मनाला चटका लावून जातात. त्या म्हणजे अकाली निधन पावलेल्या विकास धुमे, मोहन मर्तोबा वागळे यांच्यासारख्या हरहुन्नरी आणि होतकरु, कष्टाने मेहनतीने यशाची वाट पदाक्रांत केलेल्या या दोघांचा अपघाती मृत्यू हे वाचल्यावर "हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार।" ही भावना दाटून येते. तसेच स्वर्गवासी विजया तेलंग यांच्यावरचा रवींद्र पाटकर यांनी लिहिलेला हृदयस्पर्शी लेख. एकदा ट्रेनमधून पुण्याला जात असताना एका भयभीत झालेल्या मुलीला पाहून अधिक चौकशी केल्यानंतर तिला एक गुंड वेश्याव्यवसायासाठी मुंबईहून पुण्याला नेत होता हे लक्षात आले. विजूताईने धीटपणाने त्या गुंडाच्या तावडीतून त्या मुलीची सुटका केली. इतकेच नव्हे, तर तिला तशीच वाऱ्यावर न सोडता आपल्याबरोबर मुंबईला आणून आपल्या मैत्रिणीच्या घरी कामाला लावले. तसेच या वीरांगनेने समोरच्या बंगल्यातील माडावर चढून बसलेल्या दोन गुंडांना पाहिले. ते दरोडा घालण्याच्या तयारीत होते. तिने धिटाईने पोलिसांना बोलावून त्या कुख्यात गुंडांना त्यांच्या ताब्यात दिले. अशी ही धीट, कनवाळू, सेवापरायण असलेली भगिनी कॅन्सरसारख्या (त्याकाळी) असाध्य आजाराने अकाली मरण पावली, हे वाचून हळहळ वाटते. याचबरोबर कै. शांता दाभोळकर, कै. वासंती वागळे इत्यादी समाजसेवी कर्तबगार भगिनींनी सोसायटीला जे योगदान दिले, त्यांच्या आठवणी देखील अभिमानास्पद आहेत.

या स्मरणिकेचे संपादक आपले लोकप्रिय द. ना. नाडकर्णी आणि त्यांचे साहाय्यक संपादक मंडळ यांनी मिळून ही स्मरणिका विविध अंगानी फुलवत नेली आहे. द. नां. चे



## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| मंगेश नटेश आंबे, कारवार | व | लक्ष्मी मंजनाथ पै, सदाशिवगड |
| अंकूर शेखर बोरकर, मेगेशी | व | सायली सिद्धेश महात्मे, म्हापसा |
| सौम्या (रमा) समीर बोरकर, पुणे | व | तन्मय माधव पालक, मडगांव |
| मृणालिनी उदय कुलकर्णी, हाजी अली | व | अद्वैत दिलीप सुखटणकर, गोरेगाव,अमेरिका |
| रोहित शिरीष नाडकर्णी, अमेरिका | व | श्रेया उदय कुलकर्णी, आमेरिका |
| अभिजीत विजय संजगिरी, जोगेश्वरी | व | मैथिली रवीन्द्र पावसकर, जोगेश्वरी |
| डॉ. संचित नितीन तेलंग, दादर | व | डॉ. प्रीतीका हर्षद जोशी, वान्द्रे |
| अमीत शिवप्रसाद मुजुमदार, अंकोला | व | शिल्पा लक्ष्मण कामत, मंगळूर |





SIP in Mutual Funds will help you to save regularly & Discipline manner, To achieve your goal..

| Monthly Investment required for target of Rs. 1 Crore | | | |
|---|---|---|---|
| No. of Years | CAGR Returns | | |
| | 12% | 15% | 18% |
| 10 | Rs. 43,471/- | Rs. 36,335/- | Rs. 29,739/- |
| 15 | Rs. 20,017/- | Rs. 14,959/- | Rs. 10,879/- |
| 20 | Rs. 10,109/- | Rs. 6,679/- | Rs. 4,267/- |
| 25 | Rs. 5,322/- | Rs. 3,083/- | Rs. 1,717/- |

**Mangsidesh Invesments Pvt Ltd.**

**Head Office :** 402, Business Point Bldg, Behind Brahma Kumari Hsp., Andheri (West)
Tel No. 022 - 4233 2323 / 6584 1233 / 6523 8964
**Branch Office :** A/53, Shanti Shopping Centre, Next to ICICI ATM, Mira Road 401 107
Tel No. +91 91672 20380 / 022 - 2855 2111 / 2812 7555
1/11, Kappeesh Tower, M. G. Road, Mulund (West), Mumbai 400 080
Tel. No. +91672 20379 / 022 - 2568 8340

**Mutual Fund Investments are subject to market risks, Read all schemes related documents carefully.**

## पुण्यस्मरण



श्री. सदानंद शिवराम वागळे
देवाज्ञा : २३/४/१९९५



श्रीमती कमल सदानंद वागळे
देवाज्ञा : १०/६/२०१६

**प्रेम देऊनी आम्हांला, जवळ केले सर्वांना।**
**उरली साथ- तुमची, आठवणी येते क्षणाक्षणाला।।**
**कल्पनेतही नव्हते तुमचे जाणे, अधुरे राहिले जीवन गाणे।**
**आता फक्त एकच उरले, तुमच्या स्मृतीला श्रध्दांजली वाहणे।।**

वागळे (बाड) परिवार,
ठाणे (प)

## दुःखद निधन



**प्रभाकर नागेश नाडकर्णी (सांवरपै) बंगळूर**
जन्म : २ एप्रिल १९२७ निधन : ३ मार्च २०२०

**प्रिय प्रभाकर मामास**
**भावपूर्ण श्रध्दांजली**
**डॉ. मनीषा सतेज सबनीस, जोगेश्वरी**

## श्रध्दांजली

**कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी(सांवरपै)**
३५ वे पुण्यस्मरण, निधन : रविवार २८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या ३५ वर्षात एकही दिवस गेला नाही. श्रीमंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझ्या आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम

**कै. श्री. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी यांच्यातर्फे**



संपादकीय हे थोडक्या पण नेमक्या शब्दात स्मरणिकेचे सार विशद करते. ते विनयाने म्हणतात की "मी साहित्य, ललित लेखन, पत्रकारिता वा तत्सम क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती नाही" असे म्हणतानाच या स्मरणिकेकरिता त्यांनी केलेले संशोधन, परिश्रमपूर्वक मिळवलेले दस्तऐवज हे सर्व एखाद्या निष्णात पत्रकाराला लाजवील असे आहे. तसेच त्यांचे पुनर्मुद्रित केलेले 'सोसायटीचे नारायण माधव वागळे' (मुखपत्रिका ऑक्टोबर १९९३) हा लेख पु.लं.च्या 'व्यक्ती आणि वल्ली' तला 'नारायण' हा मूळ लेख शेजारीच उद्‌धृत केला आहे, त्यावरुन त्याची तुलना करायला सोपे जाते इतका झकास वठला आहे. त्याचप्रमाणे दुसरा लेख 'कारवारकारांचा लाडका नातू पु.ल.यांची पंचाहत्तरी' (मुखपत्रिका १९९३) हा गौरव लेख वाचल्यावर त्यांचे ललित लेखावरचे प्रभुत्व दिसून येते.

एरवी स्मरणिका म्हटली की ती गलेलठ्ठ, हातांना न पेलण्याइतकी जड, जाहिराती इतक्या, की त्यातील सुंदर मजकूराच्या रंगाचा भंग करणाऱ्या अशा स्वरुपात पहाण्यात येते. 'पंतकताय' मात्र या नियमाला अपवाद आहे. 'कॉफी टेबल बुक' च्या स्वरुपातली चित्रमय सुबक आकाराची ही स्मरणिका आहे.

ज्या सरस्वती मंदिराला मध्यवर्ती ठिकाणी ठेवून सारस्वतांनी त्यांच्या भोवताली वर्तुळाकार रचना करुन वसाहत वसवली, त्या डौलदार इमारतीचे मूळ रेखाचित्र मुखपृष्ठावर आहे. श्री रामेश्वराच्या आशीर्वादाने ही सोसायटी गेल्या शतकापासून आजतागायत सुखाने नांदते आहे त्या श्री रामेश्वराचे वर्तुळाकार रंगीत छायाचित्र शीर्षस्थानी आहे. आणि मध्यभागी स्मरणिकेचे 'पंचकताय' हे शीर्षक मुखपृष्ठ उलटले की 'सोसायटी'तील घडीव दगडाच्या एकमजली कौलारु इमारतीचे दर्शन घडते. अगदी सुरवातीला बांधलेल्या एकोणीस इमारतीपैकी एक. इमारतीच्या पार्श्वभूमीला अनेक आंब्याची झाडे, माड हे सर्व पाहून मुंबईत राहून कारवारशी नाळ जोडून राहिलेले कारवारकर यात प्रतिबिंबित होतात.

सरस्वती मंदिराच्या सभोवतालच्या परिसरात वर्तुळाकार रस्ता आणि त्याच्या कडेने बांधलेल्या दगडी कौलारु एकमजली इमारती, जिकडे तिकडे वड, पिंपळ, आम्रवृक्ष यांची सावली, मुलांना खेळायला मोकळे मैदान, गोव्यातील श्री मंगेशाच्या आशीर्वादाने बांधलेले श्री रामेश्वराचे देऊळ, श्री सद्भक्ती मंदिर, जोगश्वरी एज्युकेशन सोयायटीची शाळा, तसेच परिसरात असलेले सुप्रसिद्ध इस्माईल युसुफ कॉलेज ही सगळी या सरस्वती बाग सोसायटीची ठळक वैशिष्ठ्ये स्मरणिकेत दिलेला नकाशा या सर्व परिसराची कल्पना देतो.

'सरस्वतीबाग-नररत्नांची खाण' हा एक विभागच करुन त्यात टाकी महाराज, वामन मंगेश दुभाषी, कॉ. धुमे, आपल्या परिचयातले लेखक आणि समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी, कथा कादंबरीकार वसंत नरहर फेणे, आपल्या पराक्रमाने भारतीय आरमारात सर्वोच्च पदावर पोहोचलेले ॲडमिरल जयंत नाडकर्णी, हे तर आहेतच याशिवाय ज्येष्ठ पत्रकार वैकुंठ भेंडे, तसेच कुशल प्रशासक शशिकान्त फेणे हे सदाशिवगडसारख्या काळीनदी पल्याडच्या गावातून मुंबईत येऊन IAS झाल्यावर त्यांची जिल्हाधिकारी म्हणून चिनी आक्रमणाच्या स्फोटक

परिस्थितीत आसाममध्ये झालेली नेमणूक, तेथे त्यांनी लढाऊ बाण्याने कठीण प्रसंगाना यशस्वीपणे सामोरे जाऊन दाखविलेले प्रशासकीय कौशल्य हे वाचतानाच थरार जाणवतो. सरस्वती बागेत वास्तव्य करुन राहिलेली ही दहा नररत्ने तर आहेतच; पण महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व पु. ल. देशपांडे यांचा या सरस्वती बागेत व्यतीत केलेला 'बालपणीचा काळ सुखाचा' हा पुनर्मुद्रित केलेला लेख म्हणजे सोसायटीच्या आरंभीच्या काळचा इतिहास आणि त्याकाळचे वातावरण अगदी तंतोतंत डोळ्यासमोर आणतो. जोगेश्वरीपर्यंत त्या काळात वीज आली नव्हती. रात्रीच्या भयाण वातावरणात बासरी वाजवून जिवात जीव आणणारा पहारेकरी कादरखान पठाण, त्याचा मुलांना आधार वाटत असे. तसेच वयाच्या ५ व्या वर्षी टाकी महाराजांसमोर पु. लं. चे पहिलेजाहीर भाषण झाले आणि शेवट विसरल्यावर 'आता माझी दूध प्यायची वेळ झाली आहे.' असे म्हणून ते थांबवून वेळ निभावून नेण्याचे कौशल्य त्यांनी दाखवून दिले. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची बीजे याच सोसायटीत पेरली गेली, हे पु. ल अभिमानाने सांगतात. या स्मरणिकेत त्यांचा धाकट्या भावाबरोबर श्री. रामेश्वर मंदिराच्या पायऱ्यांवर बसून, त्यावेळचा त्यांचा पोशाख आणि भाबडी मुद्रा असा दुर्मिळ फोटो दिलेला आहे आणि त्याशेजारी "भाईमामा, तू तेव्हा सुद्धा असाच बावळट होतास?" हा त्यांच्या चिमुकल्या भाचीने मारलेला शेरा देखील दिला आहे.

या स्मरणिकेची सजावट 'कॉफी टेबल बुक' ला साजेशी देखणी आहे. सरस्वती बागेची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे श्री रामेश्वर, श्री मंगेश यांची फुलांच्या सजावटीसह सादर केलेली छायाचित्रे संग्रहणीय आहेत. कवळे मठ, गोकर्ण पर्तगाळी मठ आणि काशीमठ यांच्या तीनही मठाधीशांची ठळक छायाचित्रे दिली आहेत. त्याचप्रमाणे सोसायटीच्या आजी माजी कार्यकारिणी मंडळाच्या सभासदांची, सरस्वती बागेच्या परिवार संस्था आणि त्यांच्या सभासदांची छायाचित्रे हे सर्व पाहून सरस्वती बागेचा परिवार किती विस्तृत आहे याची कल्पना येते.

'सोसायटी'च्या अविभाज्य घटकांची रेखाटलेली रंगीत रेखाचित्रे तर या स्मरणिकेची रंगत वाढवतात. "फळे फुले बहरती या 'मिनी' कारवारात" या काव्यमय शीर्षकाखाली नीरफणस, आंबा, डाळिंब या फळांची रंगीत रेखाचित्रे आणि नीरफणसासारख्या अपूर्बायेच्या फळाचे कारवारकरांशी असलेले बंध-अनुबंध, तसेच डाळिंबाचे गेंदेदार फूल, बकुळ, पारिजातक, अनंत, मोगरा या फुलांनी गंधित झालेली 'बाग' यांचे वर्णन तर लगतच्या शहरी मुंबैकर भगिनींना 'टुकटक' करुन हेवा करायला लावते. "किलबिल किलबिल पक्षी बोलती" या शीर्षका सभोवती तेथे वास करुन राहणारे कोकिळ, हळदया, शहाणे घुबड, सुतारपक्षी यांची रेखाचित्रे आणि त्यांची माहिती वाचून ही एक स्वप्न-नगरीच आहे असे वाटू लागते. 'मत्स्यप्रेम आणि सारस्वत' मध्ये जोगेश्वरीत वेसाव्याहून येणारी विविध प्रकारची ताजी मासळी आणि तिच्या बाबतीत हळवा झालेला कारवारकर वर्णिला आहे. कित्येक वर्षे सोसायटीत डोक्यावर टोपली घेऊन मासळी विकायला येणाऱ्या वयस्कर 'आबा'चे रेखाचित्र फारच सुरेख आहे.



## कै. सौ. नीलम शांताराम (अरुण) कुलकर्णी (हळगे), कारवार

**जन्म - २२.९.१९५३ निधन - ३.५.२०२०**



## भावपूर्ण श्रध्दांजली

**अशी पत्नी लाभली हे माझे भाग्य ।**
**अशी माता लाभली हे मुलांचे परमभाग्य ।।**
**आता उरल्या तिच्या फक्त स्मृति ।**
**आठवत राहू तिची आम्हांवरील प्रीती ।।**
**ओम शान्ती : शान्ती : शान्ती :**

**शांताराम (अरुण), समीर, सचिन, सौ. स्नेहा, चि. रोहित**
**आणि कुलकर्णी कुटुंबीय**

# आज पासून उत्तम आरोग्यासाठी लाकडी घाण्याचे शुध्द तेल वापरुया



**लाकडी घाण्यावर काढलेले शुध्द व रसायन मुक्त तेल**

**Cold Pressed oils**

| | | |
|---|---|---|
| Groundnut Oil शेंगदाणा तेल | Safflower Oil करडई तेल | |
| Coconut Oil खोबरेल तेल | Sesame Oil तीळ तेल | Mustard Oil मोहरी तेल |
| Almond Oil बदाम तेल | Castor Oil एरंडेल तेल | Flaxseed Oil जवस तेल |

**NATURAL PRODUCTS**

| | | |
|---|---|---|
| Jaggery Powder गुळ पावडर | Jaggery Small Cubes गुळ कळी | Organic Sugar सेंद्रिय साखर |
| Turmeric Powder हळद पावडर | Rock Salt सेंधा नमक | A2 Cow Ghee देशी गाईचे तूप |
| Wild Forest Honey नैसर्गिक मध | | |

**HAIR CARE**

| | | |
|---|---|---|
| Sadhana Herbal Hair Oil | Keshvardhak Tel | Alovera Shampoo |

**Manufacture : Swanand Shatayu, Narayangaon, Pune**
**Dealers : Gurukrupa Enterprise - Marol, Andheri (E), Mumbai - 400059.**
**Enquiry / Home Delivery : Contact - 9969001649**
**– Sharad Gaitonde**




स्मरणिकेत अधुनमधून पेरलेले खास कारवारी किस्से (विशेषकरुन सोसायटीत प्रत्यक्षात घडलेले), तेथील रहिवाशांना दिलेली खास विशेषनामे ही तर कारवारकरांची खासियत तसेच कोकणी म्हणी (ग्यादी) चुटकुले, विनोदी कविता या सर्वांतून कुचिंद्रीपणा ही आपल्या ज्ञातिबांधवांची ओळख पटते. या सर्वाबरोबर संतुलन राखताना संस्कृत सुभाषिते, टाकी महाराजांनी रचलेली भजने यांनी शोभा आणली आहे.

स्मरणिका कशी असावी, याचा आदर्श या 'पंचकताय'ने पुढ्यात ठेवला आहे. किंबहूना ही केवळ स्मरणिका नसून कायम संग्रही बाळगावा असा ज्ञातिबांधवांसाठी आठवणींचा ठेवा आहे. यासाठी संपादक द. ना. नाडकर्णी आणि त्यांचे संपादन साहाय्यक विद्या धुमे, उदय नाडकर्णी, किरण कामत, सुभाष वागळे, किरण दाभोळकर, छायाचित्रकार आणि रेखाचित्रकार मोहन खरे या सर्वांनी मिळून कल्पकतेने आणि परिश्रमपूर्वक जी निर्मिती केली आहे, तिचे कौतुक करावे तेवढे थोडेच. एकंदरीत 'पंचकताय' ही नावाप्रमाणे पौष्टिक (सर्वसमावेशक) आणि खुमासदार झाली आहे.

सुभाष नीळकंठ वागळे यांचा 'श्री सरस्वती मंदिर व शांताराम मंगेश हॉल विषयी थोडेसे' हा तळमळीने लिहिलेला लेख वाचून हळहळ वाटते आणि मन उद्विग्न होते.

शाळा चालविण्यासाठी उदात्त हेतूने सरस्वती मंदिरातील जागा ठाणे जिल्हा लोकल बोर्डाच्या शिक्षण विभागाने केलेल्या विनंतीनुसार १९२५ साली पहिली ते चौथीचे वर्ग चालविण्यासाठी दिली. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ती मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या ताब्यात गेली. खेदाची गोष्ट म्हणजे महापालिकेकडे दुसऱ्या पर्यायी जागेची जवळपासच्या परिसरात उपलब्धता असताना तिने सरस्वती मंदिरात शाळेसाठी दिलेल्या जागेव्यतिरिक्त आजूबाजूची जागा देखील बळकावून सोसायटीला कोर्टकचेरी करण्यास भाग पाडले. परिणाम काय तर शांताराम मंगेश हॉलमध्ये वर्षानुवर्षे होणारे सार्वजनिक गणेशोत्सव, तसेच स्थानिक लोकांचे नाटके ऑर्केस्ट्रा वगैरे सांस्कृतिक कार्यक्रम बंद करावे लागले गणेशोत्सव श्री रामेश्वराच्या मंदिरात स्थलांतरित करण्यात आला. मात्र सोसायटीच्या रहिवाशांसाठी असलेली छोटे मोठे समारंभ करण्यासाठी वापरण्यात येणारी हक्काची जागा हातातून गेली. बऱ्याच वर्षांनंतर कोर्टाचा निकाल सोसायटीच्या बाजूने लागून सुद्धा केवळ हट्टापायी पलिका आणि तिची नोकरशाही ही जागा सोडायला तयार नाही. हे अत्यंत अशोभनीय आहे. वरील लेखाच्या बाजूला दिलेला सरस्वती मंदिराच्या हेरिटेज वास्तूचा जीर्णशीर्ण अवस्थेतला फोटो आणि बाजूच्या कोनशिलेवरची या वास्तूच्या निर्मितीबद्दलची माहिती हे पाहून मन उद्विग्न होते.

**शैलजा म. नाडकर्णी, शि. पार्क**
**९८२०१७९३८५**

## आपल्या मंदिराच्या गाभाऱ्यांत प्रवेश घेण्यासंबंधींच्या कालबाह्य प्रथेच्या संदर्भात

आपल्या मंदिराच्या गाभाऱ्यात देवकृत्यासाठी काही व्यक्तींना प्रवेश नाकारण्याच्या प्रथेच्या विरोधांत श्री. अरुण कसबेकर यांनी जानेवारी २०२० च्या मुखपत्रिकेत एक लेख लिहिला होता. हा लेख त्यांनी हिंदू जनजागृती समिती, सनातन संस्था, बांदोडे गोवा यांना या संदर्भात शास्त्राधाराची याचना केली होती. समितीचे श्री. कसबेकर यांना आलेले हे उत्तर.

"आपली स्नुषा सौ. वंदना अतुल कसबेकर यांना शांतादुर्गा देवस्थान मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश दिला जात नसल्याविषयीचे पत्र परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांना आपण पाठवले होते. गेली काही वर्षे परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे पत्रव्यवहाराची सेवा मी पाहतो. आपण हे पत्र विश्वासाने आमच्याकडे पाठवले, हे आमच्यासाठी विशेष आहे.

आपण पत्रात नमूद केलेल्या समस्येवर काहीतरी धर्मशास्त्रीय उपाययोजना मिळावी यासाठी आम्ही काही कर्मकांडातील अधिकारी व्यक्तींशी चर्चा केली. या समस्येवर उपाय निघू शकतो का, यादृष्टीने प्रयत्न केले. या प्रयत्नांत आम्हाला मिळालेली माहिती आपणाला सांगणे आवश्यक वाटते.

पत्रात वर उल्लेख केल्याप्रमाणे आपण कळवलेल्या विषयाच्या अनुषंगाने विविध माहितगार व्यक्तींशी चर्चा करणे, त्यावरील उपाययोजनांचा अभ्यास करणे, या प्रक्रियेसाठी थोडा अवधी लागला. त्यामुळे आपल्या पत्राचे उत्तर कळवण्यास विलंब झाला. त्याबद्दल प्रथम आपली क्षमा मागतो.

१. कवळे (फोंडा, गोवा) येथील श्री शांतादुर्गा देवस्थान हे खाजगी देवस्थान असून त्यावर पूर्णत: महाजनांचे नियंत्रण आहे आणि मंडळाच्या संबंधीचे सर्व कर्मकांडाचे व्यवहार महाजनांच्या नियंत्रणाखाली रुढी-परंपरांनुसार चालत आले आहेत, हे आपण जाणताच.

२. मंदिरात केवळ सारस्वत ब्राह्मणांना सोवळ्या-ओवळ्याचे नियम पाळून गाभाऱ्यात प्रवेश दिला जातो. गाभाऱ्यात अन्य जातीच्या भाविकांना प्रवेश न देण्याची परंपरा अनुमाने ५०० वर्षांपासून चालत आली आहे, असे आम्हाला कळाले.

३. या मंदिरांतील चालीरिती, प्रथा-परंपरा यांत काही बदल करावयाचे असल्यास या मंदिराची विश्वस्त सभा निर्णय घेऊ शकते. मंदिराच्या चालू असलेल्या एखाद्या परंपरेत काही बदल करावयाचा असल्यास तसे करण्याची सूचना ६००० महाजनांचा समावेश असलेल्या सर्वसाधारण सभेपुढे मांडणे आवश्यक असते. त्यानंतर त्या सभेत या सूचनेवर चर्चा होऊन विश्वस्त सभेने ती मान्य केलेल्या ठरावास पुजाऱ्यांनी मान्यता दिल्यास गाभाऱ्यात बिगरसारस्वत भाविकांना प्रवेश देण्यास मान्यता मिळेल.

म्हणजे श्री. शांतादुर्गा देवस्थानात सारस्वत ब्राह्मणांच्या व्यतिरिक्त अन्य कोणाला प्रवेश हवा असल्या ६००० महाजनांचा सहभाग असलेल्या सभेची भूमिका महत्त्वाची ठरते. ही



## पद्मभूषण डॉ. पी. आर. दुभाषी यांचे निधन



माजी केंद्रीय सचीव, गोवा विद्यापीठाचे पहिले कुलगुरु आणि भारतीय विद्याभवन, पुणे केंद्राचे अध्यक्ष डॉ. पद्माकर रामचंद्र दुभाषी यांचे ३१ ऑगस्ट रोजी ९० व्या वर्षी वृध्दापकाळाने पुणे येथे निधन झाले. अनेक वृत्तपत्रांनी त्यांच्या निधनाची बातमी ठळकपणे प्रसिद्ध केली होती यावरुन त्यांचे श्रेष्ठतत्त्व सिध्द होते.

डॉ. दुभाषी यांचा जन्म ७ मार्च १९३० रोजी कारवार येथे आजोळी पिकळे घरांत झाला होता. त्यांचे सर्व शिक्षण पुण्यातच झाले. १९४६ साली तेव्हांच्या मुंबई इलाख्यातून मॅट्रीकच्या परीक्षेत ते सर्वप्रथम आले होते. पुणे विद्यापीठांतून त्यांनी एम्. ए. व पी.एच. डी पदवी संपादन केली तर मुंबई विद्यापीठातून डि. लिट्ट ही पदवी प्राप्त केली.

भारतांत सर्वांत प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या आय. अे. एस.या स्पर्धा परीक्षेत त्यांची निवड झाली व १९५३ साली कर्नाटक कॅडरमधून भारतीय प्रशासकीय सेवेत ते रुजू झाले. राज्य व केंद्र सरकारमध्ये सेवेतील त्यांच्या प्रदीर्घ योगदानाबद्दल केंद्र सरकाने २०१० मध्ये त्यांचा 'पद्मभूषण' पुरस्कार प्रदान करुन त्यांचा गौरव केला. त्याशिवाय त्यांना इतर विविध पुरस्कार मिळाले आहेत १९९३ साली शिरोमणी पुरस्कार, मसापचा लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख पुरस्कार, पॉल एच. ॲपलबी पुरस्कार त्याना प्राप्त झाले आहेत.

१९९० साली गोवा विद्यापीठ स्थापन करण्यांत आले. तेव्हां १९९० ते ९५ या कालावधींत ते गोवा विद्यापीठाचे पहिले कुलगुरु होते. सार्वजनिक सेवा,अर्थशास्त्रीय विचार, सहकार, पंचायत राज अशा विविध विषयांवर त्यांनी २७ पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यांतील सहा पुस्तके मराठीत आहेत. त्याशिवाय अनेक वृत्तपत्रांतून त्यांनी स्तंभलेखनही केले आहे. भारत सरकारच्या वतीने त्यांनी तीसहून अधिक देशांना भेटी दिल्या आहेत.

आपल्या ज्ञातीबद्दल त्यांना विशेष आस्था होती. मुद्दाम मुखपत्रिकेसाठी त्यांनी लेखनही केले आहे १९९५ साली संघाच्याा हीरक महोत्सवी समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून पुण्याहून आवर्जून उपस्थित होते. शैक्षणिक क्षेत्रांतील त्यांच्या योगदानाबद्दल आपल्या एज्युकेशन सोसायटीने त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करुन घेतले होते.

moments with her, I wish her a very Happy 100th Birth Anniversary and thank her for showing us how to lead an enriching and wholesome life?

**Mandar Jayprakash Desai (Sohan)**
**Andheri, Mumbai - 9920527819**

**जन्मशताब्दी वर्ष**



***Smt. Nalini ( Vimal ) Mahabaleshwar Shanbhag*** **[1920 – 2020 ]**

**मातृ देवो भव पितृ देवो भव**



**IN THE MEMORY OF OUR BELOVED PARENTS**

***From : Shobha, Vrinda, Purnima, Girish and their Families***



महाजन सभा म्हणजे श्री शांतादुर्गाचे कुलकुटुंब म्हणजे एकप्रकारे कुटुंबातीलच विषय असल्याप्रमाणे आहे. त्यामुळे आपल्या कुलकुटुंबातील सर्वांनी याविषयी निर्णय घेणे योग्य ठरेल. यासाठी आपण सर्वसाधारण सभेत सहभागी असलेल्या ६ सहस्र महाजनांपैकी काही महाजनांनाही याविषयी विनंती करावी. आपण केलेले प्रयत्न समाजप्रबोधनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहेत, त्यामुळे अशा प्रयत्नांविषयी आम्हाला वेळोवेळी कळवावे. या प्रबोधनाच्या प्रयत्नांना सनातन प्रभातमधून आवश्यकतेनुसार प्रसिद्धी देऊ."

श्री कसबेकर यांनी समितीला ६ मार्च रोजी लिहिलेले प्रत्युत्तर

सप्रेम नमस्कार,

आपण मला ९ फेब्रुवारीला केलेला ई–मेल मिळाला. पण खूपच निराशा झाली! मला वाटत होते, नव्हे खात्री होती, की मी नमूद केलेल्या समस्यांवर आपण काहीतरी धर्मशास्त्रीय उपाय काढाल, काही महत्त्वाचे आधार दाखवाल व मी अगदी निश्चिंतपणे आणि संपूर्ण विश्वासाने, कवळे श्री शांतादुर्गा देवस्थानच्या विश्वस्तांसमोर आपले निष्कर्ष ठेवले असते व गाभाऱ्यांत सगोत्र नसलेल्या दांपत्यांची प्रवेश बंदीची जुनी प्रथा बंद करण्याची त्यांना प्रार्थना केली असती.

पण आपण असे काहीच मार्गदर्शन केले नाही. फक्त नमूद केले की केवळ मंदिराची विश्वस्तसभाच या गाभारा–प्रवेशासंबंधी निवाडा देऊ शकते. कारण अन्य जातीच्या भाविकांना प्रवेश न देण्याची परंपरा अनुमाने ५०० वर्षापासून चालत आली आहे.केवळ परंपराच जर एवढी महत्वाची आहे तर पती निधनानंतर पत्नीने सती जाण्याची अतिअयोग्य परंपरा, या गाभाराप्रवेशापेक्षाही खूप जुनी आहे. ती कशी काय बंद पडली ?

आज अतुल–वंदना आणि आमची दोन्ही नातवंडे अतिशय हुशार आणि आपापल्या व्यवसायांत नामांकित आहेत. त्यांचे भविष्य श्री शांतादुर्गेच्या कृपेने अतिउज्ज्वल आहे याची मला पूर्ण खात्री आहे. पण या गाभाराप्रवेश बंदी प्रकरणानंतर चौघेही अगदी आवडीने Beef Steak वगैरे बिनधास्त खातात. आपण काही पाप करीत आहोत असे त्यांना अजिबात वाटत नाही. शक्यतो कुठल्याही देवळांत वगैरे जात नाहीत. दानधर्म लाखोंनी करतात पण धर्माकरिता कटाक्षाने एक पैसा देखील खर्च करणार नाहीत. वंशपरंपरागत चालत आलेली दरवर्षी पांच वेळा महापंचमीची पूजा, गेल्या चाळीस वर्षापासून, मी स्वत: अगदी यथासांग ब्राह्मणसवाष्ण–पूजेसकट, शास्त्रोक्तरीत्या साकारीत आहे. पण गाभाराबंदी प्रकरणापासून अतुल आणि त्याचा परिवार, पूजेला हजर राहत नाहीत.

कुठल्याही प्रकारे त्यांनी आतापर्यंत या बाबतींत आपली खंत व्यक्त केली नाही. आपल्या हिंदू धर्माचा किंवा कुठल्याही धर्माचा ते जरासुद्धा अनादर करीत नाहीत. फक्त सर्वधर्मांपासून दूर राहू इच्छितात. सर्वांचे आमच्यावर अतोनात प्रेमही आहे. तसेच कुठल्याही प्रकारे आमच्यावर धर्माच्या बाबतीत दडपण आणण्याचा त्यांनी प्रयत्नही केला नाही. किंबहुना मला जरासुद्धा आश्चर्य वाटणार नाही की माझ्या नातवंडांनी परजातीय जीवनसाथीची निवड

केली आणि G.S.B. साथी कटाक्षाने टाळला.

मलाही त्यांच्याशी याबाबतींत वादविवाद करण्याचे धैर्यच होत नाही. कारण मला स्वत:लाच आपल्या धर्माची गाभाऱ्यांत प्रवेश नाकारण्याची प्रथा कमकुवत आणि अयोग्य वाटते. आपला पुरातन हिंदूधर्मच, उदाहरणासह स्पष्ट आदेश देत आहे की अशा प्रथा आपल्या धर्मालाच घातक आणि हानीकारक आहेत. मी फक्त दोनच उदाहरणे खाली देत आहे.

**उदाहरण १:-**

**वाल्मिकी लिखीत महाकाव्य** – "रामायणांत" सांगितले आहे की, नीच कुळांत जन्मलेल्या भिल्लीण-शबरीने उष्टावलेली बोरे भगवान श्रीरामाने अगदी आवडीने आणि प्रेमाने खाल्ली. परमेश्वराच्या अशा स्पष्ट आदेशापुढे, त्या हलक्या जातीच्या भिल्लीणीला राममंदिराच्या गाभाऱ्यांत श्री रामा जवळ जाण्यापासून राम मंदिराचे विश्वस्त कसे रोखू शकतील ?

**उदाहरण २:-**

**श्री शांतादुर्गादेवीचे स्थलांतर** – केळोशीहुन कवळेस श्री शांतादुर्गादेवीचे स्थलांतर सन १५६६ ला झाले आणि इतिहासच सांगतो की कवळेंतील ही जागा हरिजन वस्तीची होती. आपल्या वस्तीच्या जागी देवीस्थानापन्न होण्यात धन्यता मानून ते हरिजन स्वखुशीने, अगदी भक्तीभावाने, दुसरीकडे गेले व म्हणून माघशुद्ध षष्ठी दिवशी हरिजनांचा देवालयांत सत्कार केला जातो. आपल्या देवीचे, हलक्या जातीच्या हरिजन वस्तीत कायमच्या स्थलांतराची आज्ञा, बरेच काही संकेत आणि स्पष्ट आदेश देत आहेत.

**लक्षात ठेवा** – देव हा फक्त भावाचाच भुकेला! जातपातीचा नव्हे!! हे सर्व भेदभाव आपणच निर्माण केले आहेत. आजकाल जी ज्वलंत तसेच स्फोटक सामाजिक परिस्थिती आहे- जागोजागी धर्मजाती वरुन जाळपोळ दंगे होत आहेत- क्षणिक विचार करा- आपल्या कवळेमंदिराच्या सुरक्षिततेकरीता, तसाच प्रसंग आल्यास, फक्त गो. सा. ब्राह्मणांनाच प्रतिकार करण्याचा अधिकार असेल ? आणि कितपत आम्ही गौ. सा ब्राह्मण त्या लायकीचे आहेत ? इतर हलक्या जातीतील हिंदूंना/पोलीसांना/ सैनिकांना मंदिररक्षणार्थ भाग घेण्यास मनाई असेल ? आणि कितपत त्या गैर गौ. सा. ब्रा. हिंदूना आमच्या मंदिराबद्दल आस्था-प्रेम असेल ? क्षमा करा! इथे मी इतर हिंदूंच्याच नव्हे तर माझ्या गौ. सा. ब्रा. मुलांच्याच मनांत येणाऱ्या विचारांची कल्पना करीत होतो.

**बिहारच्या पाटणा शहरांतील सुप्रसिद्ध** – श्री. शारजील इमाम – मुंबई IIT मधून कॉम्प्युटर सायन्समध्ये M. Tech झाले आहेत. JNU-Delhi मधून मास्टर्स इन मॉडर्न हिस्टरी तसेच फिलॉसॉफीमध्ये त्यांनी डॉक्टरेट मिळवली आहे. डेन्मार्कमध्ये महिना आठ लाखच्या वर पगाराची नोकरी लाथाडून "जिहाद" चा विडा उचलण्यास भारतात आले आहेत आणि असे हजारो "शारजील" भारतात आहेत. आपण बुद्धीमान हिंदू मात्र योग्य-अयोग्य, उच्चनीच, पुरातन रुढी परंपरांचे कारण देऊन आपापसांतच झगडून सर्वनाश करुन घेत आहोत. इतरांना त्यांच्या धर्माबद्दल जी जाज्वल्य निष्ठा आहे ती आपल्यांत खूपच कमी आहे आणि दिवसेंदिवस



# HAPPY 100 DEAR VIMA AJJI

Vimal Gandbhir or Nalini Shanbhag are names of a family matriarch for the world. For me, as a grandson, they bring back memories of a gracious, loving, multi-faceted lady - my Vima ajji ! The reason I bring this up today, is to remember her all-encompassing life on the occasion of her birth centenary.

She was born in a large family of Gandbhirs on 26 October 1920 at Kanasgiri, near Sadashivgad and lived her childhood in the company of her brothers and sisters. Married to Mahabaleshwar Shanbhag, who himself lived on active and full life of 97 years. Together they not only brought up their children. well, but also supported and helped their extended family and friends from the community and beyond, in their times of need. Being blessed with a large house is not good enough, if it is not accompanied with a large heart! As the lady of the house, she always ensured that visitors and guests were well taken care of and made comfortable. She had many facets to her personality - excellent homemaker, talented cook, capable artisan (tailoring, embroidery & other such works came naturally to her, much like some of the other capable women of the time), devout seeker & wonderful storyteller.

As a premature baby in the family and the 1st one at that, I had taken everyone by surprise and got everyone "promoted" way too suddenly. Also, given the premature birth, the clothes needed were much smaller than those for a normal body. To give a perspective - none of my clothes could ever be used by any of my cousins (thankfully!) and eventually ended up fitting my cousin's doll perfectly. However, to her credit, in all this run-around, she managed to stich new clothes with miniature specifications for me, almost overnight, so that I have a brand new set for my homecoming. Not just that, the new dress also had hand-embrodery on it, so that it doesn't just end up as a makeshift dress, good enough for departure from the hospital.

Shows you the commitment and capability of the lady!

A lot of kids remembered her as "vadi-wali ajji" given her ability to make sweet vadis, virtually out of anything - mango, guava, banana, potato, tomato, bottle-gourd, you-name-it ! She never experimented with bitter gourd, else I am sure she would have sweetened that also equally! Fortunately for the Chitales, she never went professional or they would have had to contend with some serious competition!

Given the times and place she grew up in, she was way ahead & practical in her thinking and never shied away from being progressive in life. If Ajoba was my "Tell-me-Why", Ajji can certainly qualify as "Show me How" ! On behalf of all those, who got a chance to create & live these lovely

झाल्यास ओलेत्याने देखील अन्नाचा नैवेद्य बनवणे, त्यात पूजा करण्याऱ्या आजोबांना मध्येच धूप–अंगारा हातानी नेऊन देणे, शाकाहारी–मांसाहारी माणसांसाठी वेगवेगळा स्वयंपाक (विहिरीचं पाणी ओढून) ठीक साडेबारापर्यंत तयार ठेवणे, आमच्या शाळा–कॉलेजच्या वेळा पाळणे, दत्त म्हणून टपकणाऱ्या आगंतुक पाहुण्यांची सरबराई करावे ही सगळी यंत्राच्या मदतीविना केलेली तिची आयुष्यभराची धांदल आठवली की, या इटुकल्या चौकोनी कुटुंबात यंत्राच्या आणि नळाच्या मदतीने इनमीन–तीनांच करताना दमछाक होणाऱ्या आम्ही तिच्यासमोर नतमस्तक होतो.

घरातल्या माणसांवर सोडाच, कामकरी लोकांवरही तिचा लोभ होता. तिने कधीही त्यांना कमी लेखून त्यांचा अवमान केला नाही. ती त्यांची आदरणीय वैनी होती. रोज सकाळी बनविलेल्या नाश्त्यातून पाच वाटे ती बाजूला काढून ठेवी. मदतनीस, फुलवाली, कामवाली, मासेवाली आणि माड शिंपणारा यांच्यासाठी, वाड्यावरील निम्नस्तरातील बायका तिच्याकडे येऊन द्रोणातली आमली, आमटी, पापड, लोणचं असें मागायलाही कचरत नसत. त्याचप्रमाणे 'वैनी तुगेली याद येयली म्हण येयले गे' असं सांगणाऱ्या जुन्या मोलकरणी किंवा वयले गावाहून येणाऱ्या रयताच्या बायकांच्या येण्याचा खरा उद्देश तिला नेमका कळे. ती त्यांचं चहापाणी करुन जाताना आपली साडी, मुलांचे शर्ट–पँट आणि खाऊचं पुडके असें बांधून द्यायची अशी ती दिलदार होती.माझे वडील तिला थट्टेने 'तुकारामाचा अवतारच हा' असं म्हणत–दारी आलेल्या कुणालाही ती रिकाम्या हाताने पाठवत नसे. दुपारच्या वेळेला दारात आलेल्या भिकाऱ्यासमोर हिची जेवणाची पत्रावळी हमखास जाई.

तिला वाचनाची प्रचंड आवड होती. गोड आवाजाची दैवदत्त देणगीही तिला होती. पण घरात सुनेने वडीलधाऱ्यांसमोर नुसतं गुणगुणण्याच्याही तो काळ नव्हता रात्री झोपताना मला कुशीत घेऊन तिने गायलेल्या 'राधे तुझा सैल आंबाडा' 'वारा फोफावला' 'कौशल्येचा राम बाई' ह्या गीतांचे मधुर सूर अजूनही कानात घुमतात. तिचं भरतकाम हातांनी केलेलं होतं यावर आज कुणाचाच विश्वास बसणार नाही इतकं नाजूक ! वर्षभरासाठी केलेल्या बेगमीतून ती मुंबईकर –गोवेकर नातलगांसाठी आंब्याचं गोड लोणचं, सांबार, पापड असं काहीकाही वेगळं काढून ठेवायची तोच तिचा खरा आनंद होता ती तोंडाने एवढी 'घट्ट' होती की, कुणीही तिच्याकडे ओकलेल्या आतल्या खाजगी गोष्टी तिच्याकडून बाहेर जाणार नाहीत एवढा त्या ऐकवणाऱ्यांना विश्वास होता. आम्ही बालबुध्दीनुसार केवळ गंमत म्हणून केलेली टिंगल किंवा कुचिंद्रीपणा तिला बिलकुल खपत नसे. अशी ती विनम्र, सुस्वभावी आणि सुसंस्कृत होती तिच्या सहवासात आलेल्या सर्वांनाच तिने जीव लावला. आज नव्वदीच्या घरात पोचलेली नातेवाईक मंडळी तिच्या गोड आठवणीने सद्‌गदित होतात. खरोखर चंदनाप्रमाणे झिजून सर्वांच्या मनावर तिने मायेचा सुगंध दरवळवला. तिच्या २१ जानेवारी २०२१ रोजी होणाऱ्या जन्मशताब्दी निमित्त ही स्तुतीसुमने तिच्या प्रेमळ स्मृतीस अर्पण.

**सौ. मीरा तेलंग प्रभूवेर्लेकर**
**म्हापसा,गोवा**



कमीच होत चालली आहे. आणि हे निश्चितच चिंताजनक आहे.

समजा या माझ्या लेखामुळे इतर गौ. सा. ब्रा. ज्ञातिबांधवांनी नेटाने हा प्रश्न जर देवस्थानच्या विश्वस्तांपुढे ठेवला तर एक शक्यता अजिबात नाकारता येत नाही आणि ती म्हणजे गाभाऱ्यामध्यें सर्वच महाजनांना कायमची प्रवेशबंदी! सर्व पूजाअर्चा गाभाऱ्याबाहेरच!! असे झाले तर हे फारच दुर्देवी आणि घोर अन्यायकारकच ठरेल. गाभाऱ्यांत केलेली पूजा सर्व महाजनांना अगदी जिव्हाळ्याचा आणि अपूर्व आनंदाचा प्रसंग असतो. आपल्या आई शांतादुर्गेच्या कुशीत तो आपल्या सर्व शारिरीक, मानसीक आणि व्यावसायिक विवंचना काही काळतरी पूर्णपणे विसरलेला असतो. मातेसमोर तो मागणी सांगणी, दोषारोप, आभार, तक्रारी, नाराजगी, क्षमायाचना सर्वप्रकारचा वार्तालाप–मनांतल्या मनांत करीत असतो. पुजाऱ्याची नजर चुकवून मातेच्या पायावर मस्तक टेकविण्याचा प्रयत्न करतो. किमान पदस्पर्शतरी करतोच हे सर्व गाभाऱ्याबाहेर शक्यच नाही.

सद्यपरिस्थिती, सनातन संस्थेकडून फक्त एकच अपेक्षा आहे आणि ती म्हणजे आपले सकल हिंदुसमाजाला मार्गदर्शन! गरज पडल्यास कठोर, अयोग्य रुढी परंपरांच्या विरुद्ध, निर्भीडपणे, कोणाच्याही जाचक नियमांना न जुमानता आपले स्पष्ट आणि रास्त मत तसेच धर्मशास्त्रीय उपाय–योजना, समाजापुढे ठेवल्या पाहिजेत जेणे करुन सकल हिंदुसमाज उत्साहाने आणि सनातन संस्थेवरील संपूर्ण विश्वासाने आपल्या आदेशाप्रमाणे स्वत:च्या धर्माचे रक्षण करण्यास कंबर कसून उभा राहील आणि ते सुद्धा अगदी मनापासून!

इतक्या निर्भीडपणे माझे विचार मांडण्यात मी चुकीने, नकळत, जर आपले मन दुखावले असल्यास उदारमनाने मला क्षमा करावी व पत्राचे उत्तर जरुर द्यावे.

परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या प्रकृतीतील उत्तम सुधारणा शीघ्र व्हावी अशी मी आणि माझ्या कुटुंबीयांनी आई श्री शांतादुर्गेच्या चरणी प्रार्थना केली आहे. त्याचे फळ त्यांना आतापर्यंत मिळालेच असेल.

**अरुण भास्कर कसबेकर**
**९८२०२ ९१३६५/८७७९९८६६०६**


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

www.kccgoa.in

कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद



अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

फ्लॅटस् उपलब्धः 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के

प्रॉजेक्ट मान्यताः गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्यः नामवंत वित्त संस्था

a Project by:
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी

मुंबई ऑफिसः श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलिः 2683 3841/47/72. मोबाः 98336 36451
फॅक्सः 2683 3872 ई-मेलः kunalconstructiongoa@yahoo.in GOA RERA NO: PRGO05180314

गोवा ऑफिसः टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबाः 98209 33352, 98206 33321 | गोवा साईटः 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा



## सौजन्यमूर्ती आई



शालीनतेची, नम्रतेची आणि सोज्वळतेची मूर्तीमंत बाई म्हणजे माझी आई. काणकोणच्या शांताराम किन्नरकरांची ही ज्येष्ठ कन्या कमल आणि विवाहानंतरची कारवारच्या रा. ब. गणपतराव तेलंगांची ज्येष्ठ स्नुषा सुनीती,दोन्ही घरातील ज्येष्ठतेची जबाबदारी पेलता पेलता समर्थ बनलेली! कमळ जसं भ्रमरांना आपल्या पाकळ्यांमध्ये सामावून घेऊन मकरन्द शोधू देऊन तृप्त करतं, तसंच कोमल मनाची ही कमल नावाप्रमाणेच आपल्या काळजातल्या प्रेमरसाचा आस्वाद आयुष्यभर सर्वांना देत राहिली. सासरचं सुनीती हे नावही तिने सुशील सुजाण वर्तनाने सार्थ ठरवले. आयुष्यभर दुसऱ्यांची मनं सांभाळणारी दुसऱ्यांसाठी झटणारी आईच मी बालपणापासून पाहत आले. आपली एक साधी इच्छा कधी आग्रह धरुन किंवा हट्ट  करुन पूर्ण करुन घेण्याची तिची वृत्तीच नव्हती. आपण हे असं सांगितलं तर अमक्यांना नाही आवडणार आणि तसं केलं तर तमक्याची गैरसोय होईल हे विचारच तिला तिची इच्छा व्यक्त करण्यापासून परावृत्त करत. 'मनमानी' हा शब्द तिच्या जीवनकोषात नव्हताच. प्रत्येक प्रसंगी दुसऱ्याच्या चष्म्यातून पाहून समजून घेऊन, त्या दुसऱ्याबद्दल होणारा गैरसमज दूर करण्याच्या तिच्या प्रयत्नांचा कधी कधी अतिरेकच होई. पण दोघांमधल्या नात्यात बाधा येऊ नये याबाबत ती प्रयत्नशील असे.

आज मागे वळून पाहताना थक्क व्हायला होतं की कसं तिने सतत माणसांची वर्दळ असणारं आणि शास्त्रशुध्द पद्धतीने देवधर्म चालणारं घर सांभाळलं, सावरलं, निभावलं? अशा कोणत्या संस्कारांचं बाळकडू तिच्या आई-वडिलांनी तिला पाजलं की, एकत्र कुटुंबातील ज्येष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत 'व्यक्ती तितक्या प्रवृत्तीची' मर्जी राखत. तेही कुणाच्याही विरोधात 'ब्र' ही न काढता समर्थपणे घर सांभाळत राहिली? ती एवढी शक्तीमान होती? मुळीच नाही, ते हे सारं निभावून घेऊ शकली ते केवळ तिच्या मनाच्या जबरदस्त ताकदीवर! 'फक्त दुसऱ्यांसाठी' हाच संस्कार तिच्या रोमारोमात भिनलेला होता.

घड्याळ्याच्या काट्यांच्या फिरण्याबरोबर पहाटेपासून तिचे पदचक्र कुणाच्याही वेळांचा नियमितपणा न मोडता, सर्वांची कामं वेळेत करुन देण्यासाठी गरगरतच असत. गंध चंदन उगाळण्यापासून देवपूजेची तयारी करुन ठेवणे, रोज सोवळ्यात किंवा शिवाशिवी

बाहेर जाऊ लागले अर्थात सोबत घेऊनच. २५ जुलै २०११ ला बाबांचा ९१ वा वाढदिवस. आम्ही घरातल्या घरात साजरा केला. भेटायला येणाऱ्या प्रत्येकाला बाबांनी Cadbury Chocolate दिले. आग्रहाने खाऊ घातले. १५ ऑगस्टला माझी बाबांशी बरे असतानाची शेवटची भेट. मी बाबांबरोबर खूप वेळ घालवला. खूप गप्पा मारल्या. बाबा एकदम नॉर्मल होते. माझ्याशी व ब्रह्मेशशी खूप बोलले. त्या दिवशी वाढदिवसाची आठवण काढून खुश झाले. आईच्या फोटापुढे ठेवण्यासाठी आणलेली प्लास्टिक फुले ६६ की ९९ हे पाहिले तेही चष्म्याशिवाय. बाबांचे डोळे आणि दात दोन्हीही शेवटपर्यंत चांगले होते. मोतीबिंदू पिकला नव्हता. दुसऱ्याच दिवशी १६ ऑगस्ट २०११ श्रावणातला मंगळवार. बाबांची तब्येत थोडी अस्वस्थ झाली आणि थोड्याच वेळात आम्ही जवळ असताना, मी देवतेच्या फोटोला नमस्कार केला आणि वळून पाहिले तर बाबा शांतपणे कायमचे झोपी गेलेले. शेवटपर्यंत हिंडत फिरत राहिले. राहिलेली बँकेची कामं केली आणि प्रसन्नपणे गेले. हा सारा चमत्कार सव्वा रुपया काणूक आणि कुलदेवता श्री शांतादुर्गेचा गाढ विश्वास. ही गोष्ट आहे एका भक्ताच्या श्रद्धेची. अशा या श्री मंगेश, महालक्ष्मी, शांतादुर्गास आमचा प्रणाम!

**सौ. गीता ब्रह्मेश संझगिरी (दादर)**
**९८२०१४१४६५**

### विवाहाचे सुवर्ण वर्ष गांठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

प्रतिवर्षी नोव्हेंबर महिन्यांत ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनांत विवाहाचे सुवर्ण वर्ष गांठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्याची व त्यांच्याकडून आशीर्वादाचा लाभ घेण्याची प्रथा आहे. पण नोव्हेंबर २०२० महिन्यांत नेहमीचे स्नेहसंमेलन कोवीडमुळे भरविता आले नाही हा रहित झालेला सत्कार आतां नोव्हेंबर २०२१ महिन्यांत साकार होईल. त्याबद्दलची सूचना तत्कालीन मुखपत्रिकेच्या अंकात प्रसिद्ध करण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

### मुखपत्रिकेचे वितरण

मुखपत्रिकेचे अंक गेल्या वर्षभरात लॉकडाऊनमुळे प्रसिद्ध करता आले नाहीत. सदर अंक एप्रिल २०, जुलै २०, ऑक्टोबर २० व जानेवारी २१ असा चार अंकाचा जोड अंक आहे याची कृपया नोंद घ्यावी.



## वुई टुगेदर फाउंडेशन
## धान्य बँक संकल्पना

मिळून साऱ्या जणी उबारती धान्यांच्या राशी, वंचिता मुखी घास भरवती!

**धान्य बँकेचे कार्य**

- 'वुई टुगेदर फाउंडेशन ' हा सामाजिक उद्दिष्टांसाठी कार्यरत असणाऱ्या महिलांचा गट आहे. उज्वला बागवाडे यांनी 'धान्य बँक' ही अनोखी संकल्पना २०१५ साल अस्तित्वात आणली. एकीचे स्वप्न मग अनेकींचे झाले. ५ वर्षांपासून धान्य बँकेचे कार्य जोमाने सुरु आहे. धान्य बँक उपक्रमाद्वारे चांगले काम करणाऱ्या गरजू सामाजिक संस्थांना धान्याच्या रुपात मदत केली जाते.
- प्रामाणिकपणे सेवाभावी काम करणाऱ्या संस्थांना मुख्य गरज असते ती संस्थेतील निवारा घेणाऱ्या गरजूंची भूक भागवण्याची. देणाऱ्याचे हात आणि घेणाऱ्याचे हात एकमेकांच्या हातात देणारा दुवा म्हणजे 'वुई टुगेदरची धान्य बँक'! तेही इतक्या सहजतेने की देणाऱ्याला आणि घेणाऱ्याला दोघांनाही त्याचे ओझे वाटू नये. यामुळेच कितीतरी भगिनींनी या चळवळीत आपला सहभाग नोंदवला आहे.
- या उपक्रमात आता मुलुंड, गिरगाव, दादर, बोरिवली, मालाड, कल्याण, डोंबिवली, टिटवाला, नवी मुंबई तसेच पुणे आणि नाशिक येथूनही काम सुरु आहे. या गटामध्ये १५० कार्यरत महिला सभासद आहेत. त्यांच्या प्रयत्नाने २००० सुहृदयी लोक या उपक्रमातून धान्य दान करीत आहेत, ज्यामुळे ५५,००० किलो धान्य दान करण्याची क्षमता धान्यबँकेकडे आहे.

### तुम्ही कशी मदत कराल

- तुम्ही महिन्याचे १०० रुपये फक्त, यानुसार वर्षाचे १२०० रुपये किंवा अधिक (ऐच्छिक), भरुन आमच्या प्रकल्पात धान्यदाते म्हणून सामील होऊ शकता. चेक/ऑनलाइन ट्रान्स्फर/गुगल पे सुविधा यासाठी उपलब्ध आहेत.
- वाढदिवस, सण समारंभ, साठीशांती, पूजा, अधिक मास इत्यादी प्रसंगी आपण धान्यदान करु शकता. प्रत्यक्ष धान्य किंवा धान्यखरेदीसाठी निधी स्वरुपात मदत स्वीकारली जाते. मंगल प्रसंगी 'धान्यतुला' करुन ते धान्य आम्हाला पाठवू शकता.
- आपल्या मित्र मैत्रिणींना, नातवाईकांना या उपक्रमात सामील करुन घेण्यासाठी आम्हाला मदत करा. तुमच्या ओळखीच्या शाळेत/क्लब/ सोसायटी/भिशी ग्रुप इत्यादी ठिकाणी आम्हाला आमंत्रित करा, आम्ही धान्यबँकेच्या कार्याविषयी सविस्तर माहिती देऊ.
- धान्यदानाचे हे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोचावे यासाठी महिलांनी धान्यबँकेच्या कार्यकर्त्या म्हणून सहभागी व्हावे ही आग्रहाची विनंती.


पुढील मजकूर ६३ वर

## मुंबई मंचतर्फे कारवारी आनंदमेळावा

कर्नाटक आणि गोवा या दोन राज्यांच्या कुशीत वसलेला, विशाल सागर किनाऱ्यांनी वेढलेला, एक सुंदर नयनरम्य प्रदेश म्हणजे कारवार. इतल्या समुद्राप्रमाणेच कारवारी माणसं विशाल मनाची आणि त्याच समुद्रात वावरणाऱ्या विविध मत्स्यावतारांवर पोट भरुन प्रेम करणारी. नारळ, भात आणि मासे या तीन पदार्थाशिवाय कारवारी भोजन कधीच पूर्ण होत नाही. कारवारच्या विविधरंगी निसर्गाप्रमाणेच इथल्या भूमीत मुरलेल्या खाद्यसंस्कृतीतील पदार्थांच्या चवीही नाना प्रकारच्या मसाल्यांनी परिपूर्ण असतात. या आगळ्यावेगळ्या कारवारी खाद्यसंस्कृतीने आजवर स्वत:चे वेगळेपण जपलेले आहे. ही खाद्यसंस्कृती सर्वांना अनुभवता यावी यासाठी मुंबई मंचातर्फे दिनांक १९ जानेवारी २०२० रोजी जोगेश्वरी येथील के. जी. एस. हाऊसिंग सोसायटीच्या पटांगणात बारावा कारवारी आंनद मेळावा आयोजित करण्यात आला.

वॉट्स-अप्, फेसबुक तसेच वर्तमानपत्रे आदी माध्यमांतून झालेल्या जाहिरातीमुळे यंदा आबालवृद्धांनी बरीच गर्दी केली होती. मेळाव्यातील स्टॉल्सची आकर्षक मांडणी व सभोवतालची विद्युत रोषणाई लक्षवेधी ठरत होती. सुकरुंडे, चवडे, उकडीचे मोदक अशा शाकाहारी पदार्थांसह तिसऱ्याचे वडे, कोंबडी-वडे, कोलंबी मसाला, सुरमई फ्राय, सुंगटाचे लोणचे, कुल्र्यांचे लॉलीपॉप इत्यादी मांसाहारी पदार्थांचा खमंग सुवास खवय्यांना आकर्षित करत होता. पाव-भाजी, उंधियु, फ्रॅन्की, डोसा, शेवपुरी, पाणीपुरी यांचीही हजेरी होती. तिवळ, सोलकढी व कोकम सरबत या कोकमी पाचकत्रयीमुळे खाण्याची लज्जत अजून वाढली. क्षुधाशांतीनंतर गोड खावेसे वाटणारच. त्यासाठी केक्स, मफीन्स, बेळगावी कुंदा यासोबत खूप मागणी असलेले मस्तानी आईस्क्रीमदेखील होते. घरगुती उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने या मेळाव्यात पापड, लोणची, सांडगे यासोबत तयार कपडे, पर्सेस, इमिटेशन ज्वेलरी व गिफ्ट आर्टिकल्सचे स्टॉल्सची होते.

आपल्या बँकेने यंदा या सोहळ्यासाठी आर्थिक प्रायोजकत्वाचे भक्कम पाठबळ दिले. बँकेचे चेअरमन श्री. किशोर कुलकर्णी यांनी आवर्जून सपत्निक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. के. जी. एस. को ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्यांनी सोसायटीचे पटांगण या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन विशेष साहाय्य केले. त्याचप्रमाणे सारस्वत बँक, एस. व्ही. सी. बँक, इंडिअन फायर सेफ्टी सिस्टम यांनी या कार्यक्रमासाठी सहप्रायोजकांची भूमिका निभावली. या सर्वांचेच मुंबई मंचातर्फे आभार. सर्व उपस्थित असलेल्या खवय्यांचा व स्टॉलधारकांचा या मेळाव्याप्रति असलेला उत्साह आणि प्रतिसाद हेच मुंबई मंचाच्या एका तपाच्या प्रयत्नांना मिळालेला यश म्हणावे लागेल.

**डॉ. विवेक कुलकर्णी, दादर**



## श्री शांतादुर्गेचे परम भक्त श्री. मधुकर कसबेकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने

श्री शांतादुर्गेचे भक्त माझे आई बाबा श्रीमती इंदूमती व श्री. मारुती ऊर्फ मधुकर मंगेश कसबेकर राहणार जागृती सोसायटी, माहीम. बाबा B.A.R.C. मधून गॅझेटेड ऑफिसर या पदावरुन निवृत्त झाले तर आई इन्दूमती मुख्याध्यापिका व निवृत्तीनंतर N.K.G.S.B बँकेची डायरेक्टर होती. दोघेही आता हयात नाहीत. बाबांचा जन्म २५ जुलै १९२०. त्यांच्या जन्मशताब्दीच्या प्रसंगी आईबाबांना आदरांजली वाहण्याचा हा प्रयत्न. दोघांचाही श्री शांतादुर्गेवर गाढ विश्वास होता. आईचे निधन नोव्हेंबर २००८ मध्ये झाले आणि बाबांनी देवतेच्या सेवेत मन रमवले. बाबा २०१० एप्रिलमध्ये अचानक आजारी पडले. त्यांना पिकळे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. प्रकृती खूपच खराब होती Ventilator लावला होता पण प्रकृतीमध्ये कोणतीही सुधारणा नव्हती. वयही ८९-९० होते. डॉक्टरांनी आम्हाला नातेवाईकांना कळविण्यास सांगितले. शेवटी आम्ही तीनही भावंडांच्या परवानगीने Ventilator काढला. आम्ही मनाची तयार ठेवली होती पण महत् आश्चर्य, बाबांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत ते हॉस्पिटलमधून घरी जागृतीमध्ये आले. सर्व काही बिछान्यावरच करावे लागत होते. सेवेसाठी आम्ही स्वत: व माणसे ठेवलेली होती. त्यातच मला अचानक गोव्याला जाणे भाग पडले. बाबांना सोडून जाववतच नव्हते पण बाबांनीच मला व ब्रह्मेश म्हणजे माझ्या नवऱ्याला जाऊन या असे सांगितले. बाबा क्षीण आवाजात म्हणाले. ह्या पुरचुंडीत (कागदात गुंडाळलेली) काणूक आहे. ती देवतेला अपर्ण कर आणि माझे गाऱ्हाणे घाल की मला बिछान्याला खिळून राहायचे नाही. मला शेवटपर्यंत हिंडत फिरत ठेव. बाबांचा आवाज आजारपणामुळे क्षीण होता. मी ती पुडी हातात घेतली. उघडून बघितले तर आत फक्त १ रुपयाचे नाणे अधिक चार आण्याचे नाणे म्हणजे सव्वा रुपया. मलाच एवढे कमी पैसे पाहून लाज वाटली. मी माझ्या मोठ्या बहिणीला विजूताईला म्हटलेसुद्धा एवढे कमी पैसे? बाबा शांतपणे म्हणाले काणूकाच्या सव्वा रुपयांत जी ताकद आहे ती देवतेला पोहचेल. गोव्याला देवतेसमोर उभे राहून मी पुरोहित कुमार सरज्योतिषीना बाबांचा निरोप दिला. कुमारने काणूक घेतली. पुडी उघडली, सव्वा रुपया हातात घेतला आणि खणखणीत आवाजात कोंकणीमध्ये श्री शांतादुर्गा देवतेला गाऱ्हाणे घातले की 'हे देवते, मधुकर कसबेकरांन तुका सव्वा रुपया काणूक चली आणि जावयाबरोबर धाडली आसा ताजो स्वीकार कर. मधुकर हांची इच्छा आसा तशे तांका शेवटापर्यंत हिंडतेर-फिरतेर दवर.कृपा कर.' मी देवतेला नमस्कार करुन तिचा कृपाप्रसाद घेऊन मुंबईला आले आणि बिछान्यावर पडलेल्या बाबांना दिला. ही गोष्ट मे महिना २०१० मधली आणि काय आश्चर्य बघता बघता दिवसागणिक बाबांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत गेली. Ventilator काढलेला माणूस जो काही तासांचा सोबती होता, अशी व्यक्ती मधुकर कसबेकर बरे झाले. सुरुवातीला घरातल्या घरात फिरणारे बाबा हळूहळू सावकाश घराच्या

## श्रीमती निर्मला बोरकर यांच्या ९०व्या वाढदिवसाच्या निमित्ताने

श्रीमती निर्मला श्रीपाद बोरकर (प्रेमा मंगेश पिकळे) यांच्या नव्वदी (१९ मार्च१९३०) निमित्त नातीने एक कविता रचलेली आहे. सध्या ही माऊली अल्झायमरच्या आजाराने ग्रस्त आहे. ती सर्वकाही विसरलेली आहे. पण स्वत:चं माहेरचं नांव (प्रेमा) मात्र तिला अजूनही आठवतं. तिच्यासाठी ही एक छोटीशी काव्यभेट

पिकळ्यांच्या घरची तिसरी कन्या,
प्रेमा ती लाडकी, खटयाळ जरा
कारवार वसे, तिच्या मनी सदा
चेहरा हा तिचा, नेहमीच हासरा
हसत–हसत ती झाली निर्मला
जेव्हा वरले श्रीपाद बोरकरांना
असो कितीही अवघड प्रसंग
जिंकले तिने सर्वांना
घरची खरी गृहलक्ष्मी,
बोरकर कुटुंबीयांची लाडकी वहिनी
नात्यांना जोडून ठेवणारी
फुलवणारी ती खरी स्वामिनी
ओलांडून दिवस पावसाळी,
चार मुलींची ती खंबीर आई
लग्न त्यांचे, संसार त्यांचा,
पण हिच्यामुळेच त्यात खरी रोषणाई
पिकले केस, सुरकुतली काया,
आठवण ही आता फिकट झाल्या,
डोळ्यांतली ओळख मावळत जाता
पण हसऱ्या रेषा तेथेच थबकल्या
अशी ही मातृत्वाची सावली
आता जागीच आहे खिळलेली
विसरली नाती, ओळख स्वत:शी
आता फक्त प्रेमा उरली...

**अदीती सौरभ मुझुमदार**



| स्टॉलधारक | खाद्यपदार्थ / इतर जिन्नस |
| --- | --- |
| जयश्री भेडसगावकर | उंधियु, बास्केट शेवपुरी, सांबार मसाला, कडिपत्ता चटणी, भाजणी पीठ, तीळ लाडू, लोणची , पान–चहा. |
| विद्या कसबेकर | मेथी भजी, उकडीचे मोदक, चहा, मिक्स आईस्क्रीम |
| आशीष शिरोळकर | कुंदा, करदंट, कडबोळी, बेळगावी साड्या |
| लक्ष्मी पै | चवडे, चकल्या, लाडू, लोणची, पापड, सांडगे, इत्यादी |
| पंचमी वैष्णव | Veg. and Non Veg Benjo, कोकम तिवळ |
| सुमीत वागळे | पाव–भाजी, कुलचा–छोले, कुलचा–चिकन |
| वैशाली दळवी | कोलंबी मसाला–घावणे, तिसऱ्याचे वडे, खिमा–पाव, करंदी भजी, काजू उसळ, सुकरुंडे |
| मंगेश संझगिरी/वैभव सावंत | मस्तानी व इतर प्रकारची आईस्क्रीम्स, Chicken cutlets, |
| त्रिशा कसबेकर | Chicken Lollipop, Chicken Nuggets, Chicken Patties |
| सुशांत पालेकर/गौतम वागळे | Mutton Kheema-Pav, Dry Fruits |
| ऋजुता वागळे/बागेश्री बोरकर | Chicken & Mutton Kheema, Low Calorie Chicken, Frankie, Cakes |
| देवीदास शेणॉय | कोंबडी–वडे, चिकन बिर्याणी, शेव, चिवडा, इत्यादी |
| निधी चव्हाण | Ladies Purses and Lucknowi Dresses |
| संगीता सातोस्कर | गोवा व देवगड येथील प्रसिद्ध खाद्य उत्पादने |
| किशोर बोरकर | साधा डोसा, मसाला पोहे, लिंबू सरबत, कोकम सरबत |
| राघवी सडेकर | Cookies, Muffins, Cupcakes, Doughnuts, etc., Chicken Lollipop, |
| वंदना कामत | Potli Bags and Artificial Jewellery |
| विनीता पेडणेकर | चिकन बिर्याणी, Chicken Lollipop, सोलकडी, |
| आदिती सावंत | कोंबडी वडे, Chicken Lollipop, Chicken Kheema, Prawns Pickle, Fish Fry, आंबोळ्या, घावणे |
| अनन्या पाद्धये | पाणी–पुरी, चायनीज भेळ |
| विद्या गडकर | Chicken Cafreal, Chicken Xacuti, Prawns Pulav, |
| मंदार माजाळकर | Crab Lollipop Chicken Popcorn, Fish Popcorn, Fish Burger, |
| आरती जोशी | Ladies Purses. |
| विमल खाडे | पिठांचे व मासाल्यांचे विविध प्रकार |
| अर्पिता नाडकर्णी | Hand Painted & Hand Crafted Gift Articles. |
| राहुल सावंत | Crab Lollipop Chicken Lollipop, Chicken Tikka Biryani, Fish Fry, सोलकढी |
| सचिन ठाकूर | तंदूरी चिकन व इतर तंदूर पदार्थ |

## ठाणे मंच रौप्य महोत्सवी वर्ष

**( २५ ऑगस्ट १९९६ ते २५ ऑगस्ट २०२१ )**

संघाचे माजी अध्यक्ष आदरणीय कै. अरविंद पु. नाडकर्णी यांच्या प्रेरणेने आणि आग्रहास्तव दि. २५ ऑगस्ट १९९६ रोजी पूर्व उपनगरात (ठाणे सांस्कृतिक मंच) ठाणे मंचाची स्थापना झाली.

एखादी संस्था उभी करावयाची असल्यास मनुष्यबळ हवे. सुरवातीस कुठल्याच ज्ञातिबाधवांची ओळख किंवा पत्ता माहीत नसल्या कारणाने ठाण्यात भरपूर प्रयत्नानंतर कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण करण्यात यशस्वी झाली.

त्यानंतर मुलुंड, ठाणे, डोंबीवली येथे घरोघरी जाऊन ज्ञाति बांधवाशी सुसंवाद साधला आणि त्यांच्यात एकोप्याची भावना निर्माण केली.

विविध प्रकारचे कार्यक्रम सहली, क्रुझ, पुरुषांची भिशी वधूवर सूचक मंडळ असे विविध कार्यक्रम / उपक्रम सुरु करण्यात आले.

या सर्व कार्यक्रमांस /उपक्रमांस भरघोस यश मिळत गेले.

खास पूर्व उपनगर वासीयांसाठी केलेल्या मंचास संपूर्ण मुंबई, पुणे आणि इतर ठिकाणी राहणारे आपले बांधवांकडून मिळत असलेले अतूट प्रेम, कौतुक आणि प्रोत्साहनाच्या पाठिंब्यावर मंच सर्व दृष्टीने समृध्द झाला आहे. या सर्व यशाचे श्रेय आमचे सक्षम सेवाभावी आणि एकनिष्ठ कार्यकर्ते आणि आम्हास वेळोवेळी मार्गदर्शन देऊन आमच्या कार्यक्रमास मुखपत्रिकेतुन प्रसिध्दी देणारे आदरणीय श्री. द. ना. नाडकर्णी ऊर्फ डी. एन. यांना जाते.

या यशाची पुरचुंडी घेऊन मंचाने २५ ऑगस्ट २०२० पासुन रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करण्याचे आयोजिले होते पण मार्च २०२० पासून जगातील सर्व मानव जातीवर झालेल्या करोना (Covid 19) च्या आक्रमणामुळे आयोजित केलेले सर्वकार्यक्रम डिसेंबर २०२० पर्यंत रद्द करावे लागले.

नवीन वर्ष (२०२१) हळूहळू करोना मुक्त होईल ह्या आशेने आमच्या बांधवांना एकत्र आणून विविध कार्यक्रम व स्पर्धा आयोजित केल्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे

**जानेवारी २०२१ - ठाण्यात - नववर्षाचा मेळावा आणि तिळगुळ समारंभ**

| | | |
|---|---|---|
| मार्च २०२१ | - ठाण्यात - | सिंगींग स्टार स्पर्धा |
| मार्च २०२१ | - ठाण्यात - | डान्सींग स्टार स्पर्धा |
| मे २०२१ | - मुंबई - | वधूवर मेळावा |
| जुन २०२१ | - मुंबई - | ग्रॅंड फिनाले |

- करोनाचे परत परत होणारे आक्रमण आणि सभागृहाची अनिश्चित उपलब्धता हा दोन गोष्टींचा विचार केल्यास आयोजित केलेल्या कार्यक्रमात फेरफार होऊ शकतो.
- कोविडच्या पार्श्वभूमीवर सर्व सुरक्षा नियमांचे पालन केले जाईल.



मोठया उत्साहाने कोणत्याही बॅंकेबरोबर करार करतांना मठाच्या हितालाच प्राधान्य देतील यात शंका नाही. कारवारबाहेर राहणारे आपले ज्ञातिबंधू, त्यांची अत्यंतिक इच्छा असूनही - कारवारला मनसोक्त राहण्याची, सागराच्या शांत पाण्यात डुंबण्याची, स्वच्छ वाळूवर तासन्तास पहुडण्याची, खास करुन ताजाताजा मत्स्याहार बनवून खाण्याची कल्पनांच करु शकत नाही. कारण बहुतेकांनी आपली कारवारमधील वास्तू विकून मुंबई व अन्य ठिकाणी स्थलांतर केले आहे आणि कारवारच्या हॉटेल / रेस्टॉरंटमध्ये यांना साहजिकच त्यांच्या आवडीनुसार मत्स्याहार वैगेरे मिळणे शक्य नाही. पण या गाळ्यांच्या उपलब्धी नंतर हे सर्व शक्य असेल. स्वत:ला पाहिजे तसा, स्वत:च बनविलेला किंवा स्वत: समोर बनवून घेतलेला मत्स्याहार, आठवडा - दोन आठवडे कारवारला स्वस्त आणि मस्त वास्तव्य, त्यांना अगदी तन-मनाने तृप्त करेल.

**खरोखरच वरील योजनेला जर मूर्त स्वरुप दिले तर -**

१) वामनाश्रम जागेचा सदुपयोग होईल. ती जागा परक्यांकडून बळकावली जाणार नाही.

२) आज फक्त माझ्या पिढीलाच कारवारचे आकर्षण आहे. मला खात्री आहे. बहुतांश नव्या पिढीतील बांधवांनी कारवार बघितलेसुध्दा नसावे. साहजिकच नवीन पिढीला कारवारबद्दल खास आकर्षण नसले तरी कुतुहल जरुर असेल. या पिढीला कारवारबद्दल प्रेम आणि आकर्षण निर्माण करण्याची आवश्यकता आहे. वामनाश्रमाच्या सोयीमुळे या नवीन पिढीला कारवारला जाण्याची, आपल्या ज्ञातिभूमीला अगदी जवळून पाहण्याची, तसेच तिथला खास मत्स्याहार घेण्याची संधी लाभेल.

३) श्री. पु. ल. देशपांडे आणि बऱ्याच साहित्यिकांनी तसेच गुरुवर्य श्री. रवीद्रनाथ टागोरांनी कारवारच्या सृष्टीसौंदर्याचे जे अपूर्व वर्णन केले आहे, त्याचे नवीन पिढीला दर्शन घेता येईल.

४) कारवार दर्शनाच्या विविध ऑर्गनाईज्ड टूर्स - जंगलसफारी, सागरविहार, सबंध आशिया खंडातील सर्वात मोठे नाविक दल व इतर महत्वाची स्थळ दर्शने - संपूर्ण माहितीसकट, कमी खर्चात, कमी वेळेत पाहण्याची सोय करणे आवश्यक आहे. हे अगदी सोपे आहे -'अनुभव ट्रॅव्हल्स' सारख्या टूर ऑपरेटर्सनां कारवारांत ब्रांच खोलण्यास आमंत्रण ! ही ब्रांच अनुभव ट्रॅव्हल्सचे संस्थापक - परम कारवार प्रेमी कै. श्री. अरुण भट यांना त्यांच्या आप्तानी दिलेली खरोखरच भावपूर्ण श्रध्दांजली ठरेल.

५) मठाला काही खर्च न करता १० गाळ्यांचे उत्पन्न वास्तू तयार होताच सुरु होईल व कालांतराने बॅंकेचेही मुबलक भाडे ही मिळायलाही सुरवात होईल.

६) या सगळ्या व्यवहारात कोणालाही बेईमानी करण्यास तसेच कोणावरही बेईमानी केल्याची टीका करण्यास वावच उरणार नाही.

**अरुण भास्कर कसबेकर**

**९८२०२९१३६५ / ८७७९९८६६०६**

## वामनाश्रम – एक आनंदाश्रम !

कारवार हिंदु हायस्कूल पासून केवळ अर्धा कि.मी., रेल्वेस्टेशनला जायच्या वाटेवर, एका मोक्याच्या कोपऱ्यावर, रस्त्याला लागूनच – वामनाश्रमाचा प्रशस्त रिकामा प्लॉट आहे. माझ्या माहितीप्रमाणे तो सध्या आपल्या परमपूज्य स्वामीजींच्या ताब्यात आहे.

ही जागा वर्षांनुवर्षे गेली बरीच दशके, अशीच पडून आहे. जागेवर पूर्वस्थित वास्तूचे नामोनिशाणही नाही. वास्तूच्या पायाचे दगडही चोरीला गेले आहेत. आता उरलेल्या जागेचा, कोणी बाहेरच्यांनी ताबा घेण्याआधी, मठाच्या ट्रस्टींनी या प्लॉटच्या वापराचा काही मार्ग काढावा अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे. या प्लॉटबद्दल माझ्या मनांत कांही विचार आले आहेत व ते मी परमपूज्य स्वामीजींच्या चरणी ठेऊ इच्छितो. या विचारांचा आपल्या ज्ञातिबांधवांना थोडा जरी फायदा झाला तर मी स्वत:ला धन्य समजेन.

**माझ्या मनांत आलेले विचार –**

हा वामनाश्रमाचा प्लॉट कोणत्याही बँकेला त्यांच्या ब्रांचसाठी अगदी योग्य आहे. सर्वसाधारपणे खालील अटीवर प्लॉट बँकेच्या ताब्यांत देणे.

१) प्लॉटवर केलेल्या संपूर्ण बांधकामाचा खर्च बँक करेल.

२) शासनाकडून प्लान पास करुन घेण्यापासून बांधकामाच्या पूर्णत्वाचे सर्टिफिकेट घेण्यापर्यंतची संपूर्ण जबाबदारी बँकेचीच असेल.

३) तळमजल्यावर फक्त बँकेचे, त्यांना पाहिजे तसे ब्रांच ऑफीस आणि पहिल्या मजल्यावर – कवळ्यातील श्री शांतादुर्गेच्या देवस्थानाभोवती असलेल्या अग्रशाळेच्या धर्तीवर बांधलेले असे किमान दहा गाळे (One Room + Kitchen + WC) या गाळ्यांच्या बांधकामाचा खर्च सुध्दा बँकच करेल. परंतू ही संपूर्ण वास्तु, बँकेने व्यापलेल्या भागासह, मठाच्या मालकीचीच राहील.

४) सर्व गाळे उत्तमरीत्या व्यावसायिक इंटिरीअर डिझाईन द्वारा सजविले जातील. जेणेकरुन चारजण एका गाळ्यात अगदी आरामात राहू शकतील. जरुरीनुसार गॅस आणि भांडीसुध्दा पुरविण्यात येतील.

५) प्रत्येक गाळ्यात TV तसेच AC ची व्यवस्था असेल व प्रतिदिनचे भाडे – उदाहरणार्थ आजच्या परिस्थितीत – Without AC रु. ५०० आणि With AC रु. ६०० ठरविता येईल. यांत काळाप्रमाणे निश्चित फरक पडेल. जास्तीतजास्त वास्तव्य एका वेळेला सलग दोन आठवडे असेल.

६) खास कारवारी पद्धतीचा स्वयंपाक करणारे कर्मचारीही योग्य दरांत पुरविले जातील.

७) बँकेने केलेल्या तमाम बांधकामाचा संपूर्ण खर्च, तसेच गाळ्यांच्या सजावटीचा – सामानसुमानांसकट खर्च, मठाला दिलेले कर्ज समजले जाईल व बँकेचे मठाला मिळणारे दरमहाचे EMI भाडे साहजिकच बँक काही वर्षे तरी, कर्ज व्याजासकट फिटेपर्यंत मठाला भाडे देणार नाही. आपल्या बँकेचे चेअरमन श्री. किशोर कुलकर्णी तसेच वाळकेश्वर मठाचे खजिनदार श्री. चिंतामणी नाडकर्णी या आपल्या सुप्रसिध्द ज्ञातिबंधुंची मदत घेतली तर दोघेही



## कैवल्यपूर मठाच्या वाळकेश्वर येथील जागे संबंधी

आपण सर्वास ज्ञातच असेल की वाळकेश्वर येथील 'पूर्णानंद' बिल्डींगच्या समोरच आपल्या मठाच्या मालकीचा एक प्रशस्त भूभाग आहे. आणि तो गेली बरीच दशके 'गारमेंट लॉंड्री' च्या कामगारांनी बळकाविला आहे.

काही दशकापूर्वी मठाच्या विश्वस्तांनी हा भूगाग २ कोटी १६ लाख रुपयांना विकण्याचा घाट घातला होता. तत्कालचे मठाचे पुजारी श्री शांताराम गायतोंडे भटजींनी मला फोन करुन ही बातमी सांगितली. मी दी इंडियन आर्यन ॲन्ड स्टील कं. लिमिटेडमध्ये उच्च पदावर होतो. अनेक वर्षे खास करुन इमारत बांधण्यास आवश्यक असलेले सर्व स्टील सेक्शन्स विकण्याचा मला पुरेपूर अनुभव असल्यामुळे साहजिकच सर्व बिल्डर्स, खास करुन महाराष्ट्रांतील माझ्या परिचयाचे होते, बांधकामाचा खर्च तसेच एखाद्या भूभागाची किंमत काय असावी याची मला पूर्ण कल्पना होती. एखाद्या जागेच्या किंमतीची समजा कल्पना जरी नसली तरी योग्य अनुभवी ब्रोकर्स तसेच बिल्डरद्वारे अगदी रास्त किंमत काय असावी हे शोधून काढण्याची किमया मी निश्चींतपणे जाणून होतो. त्यावेळी एक बिल्डर वाळकेश्वरच्या वर नमूद केलेल्या जागेला रु. १४ कोटी द्यायला तयार झाला. त्या बिल्डरला घेऊन मी परमपूज्य श्री सत्‌चिदानंद स्वामींजीना भेटलो. माझा बिल्डर स्वामिजींना ताबडतोब रु. दोन कोटीचा चेक ॲडव्हॅन्स डिपॉझिट म्हणुन द्यायला तयार होता. हा सर्व तपशील मुखपत्रिकेच्या अंकात सविस्तर दिला आहे.

मी आणलेल्या जवळजवळ सातपट ऑफरवर मठाच्या विश्वस्तांनी पूर्णपणे उदासीनता आणि संपूर्ण दुर्लक्ष केलेले पाहून माझे मन अगदीच खिन्न आणि उदास झाले होते. माझ्या अथक प्रयत्नांमुळे व स्वत:च्या पदरचे भरपूर खर्च करुन दी रजिस्ट्रार ऑफ को. ऑप. सोसायटीज आणि हायकोर्ट तर्फे पूर्वीची दोन कोटीची ऑफर रद्द करविण्यात मी यशस्वी झालो. मठाच्या विश्वस्तांकडून जरासे जरी साहाय्य मिळाले असते तर त्या भूभागामध्ये बेकायदेशीर राहणाऱ्यांना सुध्दा बाहेर काढता आले असते. त्यावेळी म्युनिसिपल कमिशनर्स ऑफीस तसेच पोलिस डिपार्टमेंटमध्ये माझे अगदी मित्रत्वाचे सबंध होते. महाराष्ट्र शासन / कॉर्पोरेशन तसेच पोलीस दलाच्या विविध योजनांना मी स्टील सप्लाय करण्यात खूपच मदत केली होती व त्याकाळी स्टीलचा भयानक तुटवडा होता. परंतु मठाच्या विश्वस्तांकडून काहीच साहाय्य मिळाले नाही. जणूं मी एक स्वज्ञातीय शत्रू समजून माझ्याबरोबर संपूर्ण अघोषित असहकार त्यांनी कृतीत आणला. इतकेच नव्हे, मी आणलेली ऑफर बोगस आहे असा अपप्रचारही केला. केवळ त्यांना असा अपप्रचार करण्याची परत संधी मिळू नये म्हणून हा लेख मी प्रथम मुखपत्रिकेत प्रसिध्द करीत आहे.

आज मी विचार करतो. जे झाले अन् जे होत आहे ते आपल्या मठाच्या दृष्टीने खूपच हितावह आहे. जणू शांताईच्या आदेशाप्रमाणेच सर्व घडत आहे.

**शांताईचा आदेश नं. १:** विश्वस्तांनी पूर्णपणे मान्य केलेली दोन कोटी रुपयांची ऑफर कोर्टाद्वारे रद्द करण्यांत आली – मी निमित्त ठरलो.

**आदेश नंबर २ :** जवळजवळ सातपट किंमत मिळत असताना देखील हा सौदा झाला नाही – निमित्त विश्वस्तांची संपूर्ण उदासीनता आणि जाणूनबुजून दुर्लक्ष.

**आदेश नंबर ३ :** या लेखांत मी दोन प्रकल्प मांडलेले आहेत. या प्रकल्पांना कागदावर उतरविण्यांत साल २०२० उजाडले. अशा व्यवहारांची माहिती मला त्याकाळीही होती पण वेळ योग्य नसावी. या एप्रिल २०२० मध्ये महापंचमीची पूजा करताना माझ्या अंतर्मनाला शांताईकडून या योजनेवर विचार करण्याचा आदेश मिळाला.

आणि हे साल २०२० पर्यत थांबण्याच्या कारणांमागे, सद्य परिस्थिती लक्षांत घेता, शांताईची लीला ध्यानांत आली – आज त्या भूभागाची किंमत या कोरोना काळात सुध्दा कमीतकमी रु. दोनशे कोटी तरी आहे.

शिवाय मी सुचविलेल्या प्रकल्पाप्रमाणे, आपण मठाला मिळणाऱ्या मालमत्तेची किंमत सहज रु. सहाशे कोटीवर – परत सांगतो रु. सहाशे कोटीवर जाऊ शकते. तेव्हा जे झाले ते शांताईनेच घडवून आणले आणि ते निश्चितच “Blessing in Disguise” आहे.

परंतु परिस्थितीही फारच गंभीर आहे. तो प्लॉट परत ताब्यात मिळण्यांत खूपच अडचणी आहेत.

१. शासनाने / मुंबई कॉर्पोरेशनने हा भूभाग 'गार्डन' करिता रिझर्व केला आहे. तेव्हा रीतसर डिरिझर्वेशन करुन घेणे आवश्यक आहे.
२. सद्या अनधिकृतणे राहणाऱ्यांना जागा सोडण्याच्या मोबदल्यांत खूपच मोठया अपेक्षा असतील.

यासर्व आपदांचा सामना योग्यप्रकारे, योजना आखून आपल्या शांताईच्य आशीर्वादाने सफल करण्यासाठी माझ्या मनांत दोन पर्यायी प्रकल्प आहेत व ते मी आपल्यासमोर मांडत आहे.

**प्रकल्पाचा प्रथम पर्याय :**

थोडक्यांत या प्रथम पर्यायाचे टप्पे

a) संपूर्ण भूभाग बिल्डरला विनामूल्य देणे केवळ Refundable Security Deposit without interest म्हणून रु पाच कोटी घेणे. बिल्डरची केवळ रु पाच कोटींची बँक गॅरंटी चालणार नाही.
b) सबंध बांधकामाचा आराखडा, वेळोवळी त्यांत केलेली वाढ, तसेच सुधारणा मठाच्या संमतीनेच होणे अत्यंत आवश्यक आहे.
c) त्या भूभागावर जेवढे बांधकाम होईल – वैध / अवैध त्याच्या ७५% प्रत्येकी जागा (Car Parking च्या जागा आणि इमारतीची गच्ची सोडून ) तळमजल्यापासून वर मठाच्या मालकीची असेल आणि त्यावरचे मजले ( २५% जागा) बिल्डरच्या मालकीची



१) बिल्डरची भूमिका मठानेच करावी. मला खात्री आहे मोठमोठया कंपन्या (Corporates) जागा ओनरशिपवर ! भाड्याने घेण्यास उत्सुक असतील. एखादी परदेशी कंपनी संपूर्ण बांधकाम (Long Lease) ने घेण्यास भरपूर ॲडव्हान्स देण्यास तयार होईल. त्यांच्या आवश्यकते प्रमाणे बांधकामाचा आराखडा तयार करावा लागेल.

२) NKGSB बँकेने सर्व प्रकारे आर्थिक व्यवहार सांभाळावे. जोपर्यंत आमच्या बँकेचे चेअरमन श्री. किशोर कुलकर्णी आणि वाळकेश्वर मठाचे खजीनदार श्री. चिंतामणी नाडकर्णी सारखे ज्ञाती प्रेमी आणि स्वामीनिष्ठ बँकेत उच्चपदस्थ अधिकारी आहेत. तोपर्यंत मठहिताची चिंता नाही. शिवाय बँकेला तारण म्हणून रु. २०० कोटीची जागा आहेच.

३) त्रिदेव अर्थात आपले सर्व कसब लावून निश्चित आपआपली कार्ये पूर्ण यशस्वी करतील.

४) मठाची प्राप्ती कमीतकमी रु. ७०० कोटी होईल.

५) मठांच्या विश्वस्तांनां माझी नम्र विनंती आहे की, त्यांनी मी दिलेल्या पर्यांयांवर अत्यंत गंभीरपणे विचार करावा. योग्य तज्ज्ञांचा जरुर सल्ला घ्यावा. सुचविलेल्या उपयायोजनांत अधिक लाभदायक मार्ग सुचले तर जरूर त्यांवर अंमल करावा. माझ्या या लेखावर माझ्याशी चर्चा करावीशी वाटली तर त्यास मी सदैव तयार आहे.

माझी वाचकांनाही खास विनंती आहे की, त्यांनी आपली स्पष्ट मते, खास करुन तीव्र निषेध पण त्यांचे रीतसर स्पष्टीकरण, त्यावर सुचविलेले उपाय मुखपत्रिकेच्या संपादकांना जर कळविले तर त्यास मुखपत्रिकेत प्रसिध्दी दिली जाईल आणि संपूर्ण GSB समाजच त्याची योग्य दखल घेईल.

माझ्या चुकी तुम्ही दाखवून दिल्या व जर मला त्या पटल्या तर जाहीरपणे माफी मागण्यात मला जरा सुध्दा संकोच वाटणार नाही, उलट मी सदैव आपला ऋणी राहीन. कारण माझ्या ज्ञातिबांधवांचे, आपल्या मठाचे, परमपूज्य स्वामीजींचे आणि माझ्या शांताईचे आशीर्वादच माझे सर्वस्व आहे.

**अरुण भास्कर कसबेकर**
**९८२०२९१३६५**

पृ. ११ वरुन

**कु. आर्या रवीन्द्र वर्टी** – 'संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान' तर्फे मूल्य शिक्षणावर आधारित परीक्षा घेतली जाते. यावर्षी इ. ५ ते ८ च्या विद्यार्थ्यांसाठी रामायण, महाभारत व क्रांतीकारक यांच्या कथांवर आधारित ही परीक्षा मराठी / हिंदी / गुजराथी माध्यमातून आयोजित करण्यात आली होती. यावर्षी विले पारले विभागातील १८ शाळांपैकी सुमारे २५०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. विले पारले येथील सौ. साधना व रवीन्द्र गजानन वर्टी यांची पार्ले टिळक विद्यालयात शिकणारी कन्या कु. आर्या हिला तिच्या गटांत मराठी भाषेतील परीक्षेत प्रथम क्रमांक मिळाला. १९ फेब्रुवारी रोजी भरलेल्या समारंभात तिला सुवर्णपदक व प्रशस्तीपत्रक प्रदान करण्यांत आले.

असे त्रिदेव माझ्या परिचयाचेच  नव्हे तर माझे परममित्र आहेत. सद्या देश कोरोनाच्या महामारीच्या विळख्यांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहे. मठाच्या दृष्टीने या योजनेस, खास करुन जागा रिकामी करुन घेण्यास हीच वेळ योग्य आहे.

माझ्या परिचयाचे त्रिदेव

**Counsel**

**१) श्री. अरविंद सावंत** : केरळ हायकोर्टातून चीफ जस्टीस म्हणून निवृत्त झाले, मुंबई हायकोर्टाचे पाच वर्ष ते Administrator होते व सद्या सुप्रीम कोर्टात प्रॅक्टीस करतात.

बिल्डरबरोबर ॲग्रीमेंट, जागा अनधिकृतपणे बळकावून बसलेल्यांना बाहेर काढण्यासाठी आतापर्यंत केलेल्या कारवाईचा आढावा व पुढील कायदेशीर योजना आणि त्याची अंमलबजावणी, बांधकाम तयार झाल्यावर Lease Agreements त्यांचे रीतसर रजिस्ट्रेशन व इतर काहीही कायदेशीर सल्ला मठाला आवश्यक असलेला.

**शासन / महापालिका संबंधीत व्यवहार**

**२) श्री. यशवंत भावे (आय.ए.एस.रिटायर्ड)** : Government of India, New Delhi मध्ये त्यांनी अतिशय उच्च पदे भुषविली आहेत.(राज्य शासनाच्या चीफ –सेक्रेटरी बरोबरची) महाराष्ट्रातही काही काळ ते इंडस्ट्रीज डिपार्टमेन्टचे सेक्रेटरी होते.

शासनाकडून / बीएमसीकडून गार्डनचे डिरिझर्वेशन करुन घेणे. योग्य कारणे देऊन FSI वाढवून घेणे. शासनाला/ बीएमसीला अत्यंत योग्य रीतीने ड्राफ्ट केलेली ॲप्लीकेशनस् ! शिवाय श्री. भावेंच्या प्रचंड अनुभवाचा, ओळखींचा आपल्याला खूपच मदत, तसेच चोख मार्गदर्शन मिळू शकते. अतिशय इमानदार, प्रामाणिक, हुशार आणि कर्तबगार असा श्री. भावेंचा लौकिक आहे. मंत्रालयातील सामान्य कारकुनापासून मुख्यमंत्री पर्यंत सर्व स्तरांवर श्री. भावेंचा आदरपूर्ण दबदबा आणि लौकिक आहे.

**वास्तुविशारद (Architect)**

**३)श्री. अमोल प्रकाश शेटगिरी** : मुंबई विद्यापीठाचे आर्किटेक्चर विषयांत गोल्डमेडलीस्ट मुंबईतील बोटावर मोजण्यात येणाऱ्या कुशल आर्किटेक्टसमध्ये त्यांची गणना ! अतिशय प्रामाणिक आणि आपल्या GSB ज्ञातीचे विलक्षण अभिमानी, तसेच परमपूज्य स्वामी आणि मठ यांचे निस्सीम भक्त.

अमोल या जागेचा मठाच्या हिताच्या दृष्टीने जास्तीत जास्त कसा उपयोग करुन घेता येईल याची जरुर खबरदारी घेईल. शिवाय योग्य कारागिरांची (Sub Contractors) निवड व जबाबदारी घेतल्याने बांधकाम सुबक, चांगले, योग्य आणि रास्त किंमतीला होईल.

**प्रकल्पाचा द्वितीय पर्याय**

प्रथम पर्यायात दिलेले 'त्रिदेव' जर मठाला मान्य असतील तर माझे असे मत आहे की, या द्वितीय प्रकल्पांत –



असतील. मठ फक्त वैध बांधकामालाच परवानगी देईल पण बिल्डरने जर काही अवैध बांधकाम मठाच्या विश्वस्तांच्या नकळत किंवा त्यांचा विश्वासभंग करुन केले, तर त्याची संपूर्ण जबाबदारी तसेच खर्च बिल्डरलाच भोगावा लागेलच, इतकेच नव्हे तर या अवैध बांधकामाचा ७५% भागही मठाला मालकी हक्काने द्यावा लागेल.

d) कार पार्किंग : इमारतीच्या तळघरांत (Underground) / इमारतीतच / कंपाऊंडच्या आंत / उघडयावर / कव्हर्ड सर्व प्रकारच्या प्रत्येक कॅटेगरीत मठाला ७५% आणि बिल्डरला २५% जागा मालकी हक्काने मिळेल.

e) इमारतीच्या गच्चीवर मठाचा १००% मालकी हक्क असेल. गच्चीचे क्षेत्रफळ मठाच्या ७५% भागींत धरले जाणार नाही.

f) इमारतीचा किंवा भूभागाचा कुठलाही भाग जर जाहिरातीकरिता वापरला गेला तर त्याचे संपूर्ण उत्पन्न, हक्क १००% फक्त मठाचेच राहतील.

g) बिल्डरने स्वत:च्या कर्तृत्वाने (?) जर जास्ती FSI मिळविला तरी त्यांचा संपूर्ण खर्च केवळ बिल्डरनेच करणे आवश्यक आहे आणि या जास्त केलेल्या बांधकामाचासुध्दा ७५% भाग मठाच्या मालकीचा होईल कारण ज्या जमिनीवर हा ज्यादा FSI दिला आहे. ती जमीन मठाच्या मालकीची आहे.

h) बिल्डर संपूर्ण खर्च १००% खाली दिल्याप्रमाणे स्वत:च करेल :

१) या भूभागामध्ये केलेल्या बांधकामाचा संपूर्ण खर्च.

२) सद्याच्या रहिवाश्यांना बाहेर काढण्याचा खर्च

३) मठाशी करार करताना दिलेले पाच कोटी रुपये – Refundable security deposit without interest  सबंध बांधकामाचे Completion Centificate BMC कडून मिळताच मठ हे रु पांच कोटी बिल्डरला परत करील.

४) बांधकाम करताना शासनाकडून तसेच BMC कडून लागणाऱ्या सर्व परवान्यांची व्यवस्था व त्यासाठी होणारा खर्च.

५) सर्व कायदेशीर जागा / बांधकामा संबंधी कोर्टाची कामे तसेच शासनाने / नागरपालिकेने जाहीर केलेल्या गार्डनचे, डिरिझर्वेशन केवळ बिल्डरलाच करावे लागेल.

६) संपूर्ण प्रोजेक्टमध्ये जरुरी असलेल्या अ) एक निष्णात वकील ब) अत्यंत हुशार रिटायर्ड IAS शासन अधिकारी व क) स्वत:च्या कामांत पारंगत असलेला आर्किटेक्ट अशा तीन महत्वाच्या विश्वासू आधिकाऱ्यांची व्यवस्था मठ करेलच. जेणेकरुन बिल्डरचे काम लवकर, कमी खर्चात होण्याची शक्यता वाढेल. परंतु या तिघांची प्रोफेशनल फी / मानधन व इतर खर्च संपूर्णपणे बिल्डरलाच करावा लागेल.

७) मठाच्या मालकीची एकुण बांधकामाच्या ७५% जागा विकण्याची / भाडयाने देण्याची जबाबदारी फक्त मठाची किंवा मठाचे Autorised Agents चीच असेल. बिल्डरला याबाबतीत जरासुध्दा अधिकार किंवा कुठल्याही प्रकारे हस्तक्षेप करण्यास परवानगी

नाही. इतकेच नव्हे तर, २५% बिल्डरच्या मालकीची जागा विकण्यास / भाडयाने देण्याआधी मठाची लेखी परवानगी आवश्यक आहे.

**एक चिंतन :** मठाचे विश्वस्त काही दशंकापूर्वी हा वाळकेश्वरचा भूभाग रु. दोन कोटींना विकण्यास तयार झाले होते. श्री स्वामीजींना त्यावेळी कवळे व इतर ठिकाणी असलेल्या मठांच्या डागडुगीलाच दोन कोटी रुपयांचा खर्च अपेक्षीत होता. त्यावेळी ही संपूर्ण रक्कम या डागडूजींतच खर्च झाली असती. पण वरील प्रकल्प मान्य केल्यास मठाच्या वास्तुंची किंमत काळाप्रमाणे वाढतच जाईल. ही वाळकेश्वरची जमीन बिर्ल्डर तर्फे मलबार – हिल एरीयात गणली जाते. आज वाळकेश्वरमध्ये फ्लॅटचे भाव कमीतकमी रु. ८०,०००/– प्रत्येक स्क्वे. फुट असायला पाहिजेत. किंबहुना जास्तच असू शकेल. केवळ मोठया कंपनीना (Corporates) जर मठाच्या मालकीचे फ्लॅट्स (Flats) लॉन्गलीज वर दिले तर मठाला दरमहा कमीतकमी रु. एक कोटीची दणदणीत रक्कम मिळेल. सर्वसाधारणपणे एक वर्षाच्या भाडयाची रक्कम वास्तुच्या किंमतीच्या कमीतकमी दोन टक्के २% असते. वर्षाचे भाडे – वास्तुची किंमत रु सहाशे कोटीचे २% म्हणजे रु. १२ कोटी – म्हणजेच रु एक कोटी महिन्याचे भाडे होते – ज्यांत दर तीन वर्षांनी १५% वाढ होईल. आपला मठ स्वखर्चाखेरीज ज्ञातिबांधवांचेही भरघोस कल्याण करु शकेल आणि करत राहील. तळमजल्यावर NKGSB बॅन्केची आलीशान शाखा, ज्ञातिबांधवांसाठी एक प्रशस्त आणि भव्य सभागृह, एक छोटेसे नर्सिंग होम, मठाला दाम आणि दुवा ज्ञातिबांधवांकडून भरपूर मिळेल.

**तुमच्या मनांतील एक प्रश्न ? :** ही ७५% आणि २५% भागीदारीचे निष्कर्ष कसे ठरले ?

आज मुंबईत कोठेही फ्लॅटची किंमत त्याच्या भूभागाच्या ठिकाणावरुन ठरविली जाते. जो फ्लॅट उपनगरात रु २०,०००/– पर स्क्वॅफुट मिळू शकतो त्याच टाईपचा फ्लॅट वाळकेश्वरला रु. ८०,०००/– पर स्क्वॅफुट मिळेल. बांधकामाचा खर्च मात्र उपनगरांत किंवा वाळकेश्वर एरीयांत एकच असेल. सद्या बांधकामाचा जास्तीत जास्त दर रु. ३०००/– पर स्क्वॅफुट असायला पाहिजे.

अ) समजा वाळकेश्वरच्या प्लॉटवर पूर्ण बांधकाम १००,००० स्क्वॅफुट असेल तर

ब) संपूर्ण बांधकामाचा खर्च.

१००,००० स्क्वॅफुट **x** रु. ३००० पर स्क्वॅफुट **=** रु. ३० कोटी होईल.

क) फ्लॅटच्या विक्री किंमत जर रु. ८०,०००/– पर स्क्वॅफुट धरली तर मठाच्या वाटणीच्या

१००,००० स्क्वॅफुट ७५% **=** ७५,०००स्क्वॅफुटची किंमत

७५,००० स्क्वॅफुट **x** रु. ८०,००० पर स्क्वॅफुट **=** रु. ६०० कोटी होते.

ड) बिल्डरच्या २५% जागेची किंमत

२५,००० स्क्वॅफुट **x** रु. ८०,००० स्क्वॅफुट **=** रु. २०० कोटी

बिल्डरच्या रु. २०० कोटी उत्पनातून बांधकामाचा रु. ३० कोटी खर्च काढला तर रु. १७० कोटी उरतील व वर दिलेल्या h (1 to 7) सदरामध्ये बिल्डरने करण्याचा खर्च कुठल्याही



परिस्थितीत रु. ७० कोटीपेक्षा खूपच कमी असेल.

याचा अर्थ बिल्डर या 'प्रथम पर्याया' अंतर्गत त्याच्या २५% भागीदारींत कमीतकमी रु. १०० कोटी तरी कमवेल.

अर्थात अंतिम बांधकाम किती स्क्वॅफुटाचे होईल यावरच ७५/२५ भागी अवलंबून असेल. बांधकाम जर १००,००० स्क्वॅफुट बिल्ट अपपेक्षा जर कमी असेल तर बिल्डरला जास्त भागी मिळेल आणि संपूर्ण बांधकाम एक लाख स्क्वॅफुट पेक्षा जास्त झाले तर बिल्डरला २५% पेक्षाही कमी भागी मिळेल.

**आपल्या मठाचा फायदा :**

अ) जवळजवळ रु. ६०० कोटीची प्रॉपर्टी कायमची मठाच्या मालकीची होईल.

ब) मोठमोठ्या कंपन्याकडून मठाला दरमहा लीजरेंट कमीतकमी रु. १ कोटी मिळतील त्यांत दर तीन वर्षांनी १५ टक्के वाढ होईल.

क) काही अपरिहार्य कारणांमुळे प्रॉपर्टीचा काही भाग मठाला विकणे आवश्यक ठरले तर मठाला विक्रीच्या वेळी असलेला भाव मिळेल.

ड) समजा मठाने ठरविले की या सर्व भानगडीत न पडता संपूर्ण वाळकेश्वरचा भूभाग रु. २००+ कोटीला विकणे, तर या रकमेत रोकड भरपूर मिळण्याची शक्यता असेल व ही रोकड हाताळणे मठाला खूपच जड जाईल. कॅश शासनाकडून पकडली गेली तर अब्रूचा प्रश्न! कॅश जपून ठेवणे आणि सुरक्षित ठेवणे त्याहुनही अतिशय कठीण ! जरी योग्य ठिकाणी खर्च केली, ज्ञातिबांधवांच्या उत्कर्षासाठी वापरली तरी त्यांचा हिशोब दाखविणे महा कठीण ! म्हणजेच ऑडीटचा प्रश्न ! कॅशचे व्यवहार जरी इनामइतबारे प्रामाणिकपणे केले तरी आपल्या ज्ञातींत संशय घेणारे खूपच !

इ) हे सर्व त्रास टाळण्यांत आणि मठ असेतोवर मठाला कायमचे आणि खात्रीचे उत्पन्न, जेणेकरुन आपल्या ज्ञातीतील गरजूंना आपला मठ योग्य मदत अगदी आरामांत करु शकेल आणि तेही वर्षानुवर्षे.

फ) शिवाय कॅपिटलगेन व इतर टॅक्सेसमध्ये प्रचंड बचत होईल.

ज) या संपूर्ण प्रॉजेक्टमध्ये कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार विश्वस्तांतर्फे, मठातर्फे होणे किंवा आम ज्ञातिबांधवांनी कुठल्याही बाबतीत याबाबत संशय घेण्याची शक्यताच उरणार नाही.

ह) या संपूर्ण योजनेंत मठाची गुंतवणूक / खर्च – ० रु.

**एक अत्यंत महत्त्वाची सूचना :** या संपूर्ण व्यवहारांत मठाला (१)अत्यंत हुशार, अनुभवी, प्रामाणिक, हिंदुधर्म, आपला मठ आणि मठाधिपतींचा आदर करणारे ज्येष्ठ Counsel (वकील) २) महाराष्ट्र शासन / मुंबई महानगरपालिका यांच्या कार्यपध्दतींची संपूर्ण माहिती असणारा प्रचंड अनुभवी, कर्तबगार IAS रिटायर्ड अधिकारी, शिवाय ३) अत्यंत कल्पक, अनुभवी आपल्या धर्मावर पूर्ण श्रध्दा असलेला मठाचा हितचिंतक वास्तुविशारद (Architecht) अशा तिघांची टीम जर मठास मिळाली तर ही योजना मुदतपूर्व व सुरळीतपणे पार पडेल.